श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे

(जैन अल्पसंख्यांक संस्था)



## श्रीमती शांताबाई कांतीलाल गांधी कला, अमोलक विज्ञान व पनालाल हिरालाल गांधी वाणिज्य महाविद्यालय,

नॅक "B" दर्जा | कडा, ता. आष्टी, जि. बीड | ISO 9001 : 2008

# अमोलक




त्रैतायां मन्त्र शक्तिश्च, ज्ञान शक्ती कृते युगे
द्वापारे युद्ध शक्तिश्च संघे शक्ती कलियुगे ।।

कलियुगात आलेल्या संकटास सामोरे जाण्यासाठी
ज्ञान व एकजुटता यातच खरे सामर्थ्य आहे

# कोरोना मुक्तीसाठी
# ‘‘विश्वप्रार्थना’’

आपण भारतीय आणि आपली संस्कृती
हि अध्यात्म आणि शास्त्र (विज्ञान) वर
आधारित आहे !
आपण कोणत्याही जाती धर्माचे असा
फक्त हि वेळ आहे माणसांमाणसातील
‘‘माणुसकी’’ जिवंत ठेवण्याची...
चला तर मग आत्तापासूनच आपण सर्व
ब्रह्मांडातील वैश्विक शक्तीला शरण जाऊन
कोरोना मुक्तीसाठी आपल्या इष्ट दैवताचे
सतत नामस्मरण करुन एकमेकांसाठी
विश्वप्रार्थना करुया !
‘‘दवा आणि दुवा’’ या दोन्ही गोष्टी
सध्या आवश्यक आहेत...

श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे

## श्रीमती शांताबाई कांतीलाल गांधी कला, अमोलक विज्ञान व पनालाल हिरालाल गांधी वाणिज्य महाविद्यालय

कडा, ता. आष्टी, जि. बीड

# अमोलक

कोरोना कोविड-१९ वार्षिक विशेषांक

२०२१-२२

**✻ प्राचार्य ✻**

डॉ. एन. एस. राठी

**✻ संपादक ✻**

प्रा.डॉ. सुपर्णा देशमुख

रसायनशास्त्र विभाग प्रमुख

**✻ विभागीय संपादक ✻**

प्रा. सुनिता बोम्बे ✻ प्रा.डॉ. योगेश रसाळ

# अमोलक

कोरोना कोविड-१९ वार्षिक विशेषांक

२०२१-२२

**✻ प्रकाशक ✻**

डॉ. एन. एस. राठी

प्राचार्य

**✻ संपादक ✻**

प्रा.डॉ. सुपर्णा देशमुख

रसायनशास्त्र विभाग प्रमुख

**✻ मुद्रक ✻**

रिध्दिका ग्राफिक्स, अहमदनगर

**✻ मुखपृष्ठ संकल्पना ✻**

प्रा.डॉ. सुपर्णा देशमुख

रसायनशास्त्र विभाग प्रमुख

**✻ प्रकाशन काळ ✻**

वार्षिक

**✻ प्रकाशन स्थळ ✻**

श्री. अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे

श्रीमती शांताबाई कांतीलाल गांधी कला,

अमोलक विज्ञान व पनालाल हिरालाल गांधी वाणिज्य महाविद्यालय,

कडा, ता. आष्टी, जि. बीड

(खाजगी वितरणासाठी विक्रीसाठी नाही.)

**२०२१-२०२२ या वर्षात भारतातील व**
**महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतीक,**
**सहकार व शैक्षणिक क्षेत्रातील**
**तसेच**
**परिसरातील मान्यवर व्यक्ती**
**दिवंगत झालेले आहेत त्यांना**

# भावपूर्ण श्रध्दांजली

**अर्पण करीत आहोत.**





## जैनाचार्य शास्त्रोद्धारक श्री. अमोलक ऋषीजी म.सा.

संस्थापक

**श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ**

कडा, ता. आष्टी, जि. बीड



## PRINCIPALS DESK..

There are very few events in the period of world history that made the world to step down. It we take a glance at if we find that there were wars between the two kingdoms it extension of Continents ,or sometimes there were the reasons of some pandemic diseases that caused the loss of human wealth. But one important thing about all the above mentioned Causes is that we just have read or heard about it. The 21st Century witnessed a different kind of calamity that created the distance between .the intimate relations. It was that Covid-19 disease when like the two opposite poles of magnet, human being opposed each other due to the fear of death. It has shown that human life is ephemeral. It is another part of science that who is responsible for the evolution of such kind of hazardoues vines We all know that it was first observed in China. The country instead of sharing the problem on the world health platform, was some what responsible for the spread of the virus crossing the geographical territories .It had taken the toll of millions of death .The diseas has introduced the unexpected way of human life. it has not just caused the loss of human wealth but the world of finance was also shattered very tremendously. The world of industry was badly shaken casing the starving of people throughout the world. Many people have lost their lives through transportation & depression etc. The man came to know the true value of human health . After a long research the Vaccines were prepared India helped to save the human lives to many countries on the world map. Let me take this opportunity to all the scientists to express heart felt gratitude to their efforts. . Now we must take lessons from this experience and let's unite together with the determination to avoid such a great loss in future. The only thing that we have to follow is to learn the new ways of living human life. At the last," To know is Good To live is Better, To be, that is Perfect ,"

**Dr. N. S. Rathi**
Principal



# मनोगत

आपल्या महाविद्यालयाचा ' अमोलक– कोरोना ' विशेषांक प्रकाशित होत आहे याचा मला मनस्वी आनंद होत आहे. नुकतेच आपण कोविड –१९ च्या भयावह परिस्थितीतून तावून सुलाखून स्वस्थपणे बाहेर पडलो आहोत. .

लॉकडाऊन हा शब्द प्रथमच वापरात येऊन परवलीचा झाला आहे.अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी प्राध्यापकांनी डिजिटलायझेशनची अंमलबजावणी करीत यशस्वी पणे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे याचा मला अभिमान आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थी हे तारुण्याच्या उंबरठ्यावर उभे राहून जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रयत्नशील असतात. ध्येयप्राप्तीसाठी अथक परिश्रमांची जोड देणे आवश्यक आहे. यशस्वी लोक आणि अयशस्वी लोकांमध्ये छोटासा फरक आहे. जगातील सर्व यशस्वी लोकांच्या यशाचे एकच रहस्य आहे, निरंतर मेहनत आणि धैर्य. सुप्रसिद्ध लेखक शिव खेरा यांनी सांगितले आहे Winners don't do different things, they do things differently.... मित्रांनो, जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रचंड कष्ट करा, व शारीरिक आणि मानसिक ताकद प्राप्त करा. यशस्वी लोकांना आदर्श मानून त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेऊन अयशस्वी लोकांचा देखील अभ्यास करा, कारण इतरांच्या चुकांमधून आपल्याला अनेक गोष्टी अवगत होतात.

जगामध्ये अशी कोणतीही गोष्ट नाही आहे जी मनुष्य साध्य करू शकत नाही. फक्त आपण जे काही ध्येय स्वतःसाठी पाहत आहोत ते साध्य करण्यासाठी कठोर परिश्रम केले पाहिजे. जर तुम्ही ध्येयासाठी सतत प्रयत्नशील असाल आणि धैर्य न गमावता प्रयत्न करत असाल, तर एका नवीन दिवशी नक्कीच आपल्याला यश प्राप्त होईल. आपले लक्ष्य साध्य करण्याच्या प्रयत्नात अनेकदा असे होते कि आपण आपले धैर्य गमावू लागतो. अशी वेळी स्वप्रेरणादायी असा स्वसंवाद करा. प्रत्येक क्षणाला आत्मपरीक्षण करण्याची सवय लावून घेतली तर जीवनात यश तुमचेच आहे यावर विश्वास ठेवा.

यशस्वी व्हायचं असेल तर, सुरुवात एकट्यानेच करावी लागते !! जेव्हा तुम्ही जिंकू लागता; तेव्हा लोक आपोआप तुमच्या मागे येतात.. कारण धावत्याला शक्ती येते आणि रस्ता सापडतोच....

सर्वांना यशस्वी वाटचालीसाठी माझ्या अनेकानेक हार्दिक शुभेच्छा...

**श्री. हेमंतकुमारजी पोखरणा**

**प्रधानमंत्री, श्री अमोलक जैन**

**विद्या प्रसारक मंडळ, कडा**



हिंदवी स्वराज्य संस्थापक

**श्री छत्रपती शिवाजी महाराज**



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**



# संपादकीय...

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपण फक्त शिक्षणातील दोषांची रीच ओढीत आलेलो आहोत. आता कोविडोत्तर काळात अगोदरची आणि नवीन पद्धती यांचा समतोल साधून आपल्या मुलांना त्यांचे भविष्य सुरक्षित, विकसित, उज्वल करणारे शिक्षण देण्याची जबाबदारी आपल्यावर येऊन ठेपली आहे हे जाणवायला लागले आहे. कोरोना काळात शिक्षणपद्धतीतील अनेक उणीवा समोर आल्या. खडू फळा हे एकमेव साधन, घोका व ओका किंवा घ्या लिहून ही अध्यापन पद्धती व मूल्यमापनासाठी परीक्षा हे एकमेव अस्त्र हे सर्व कुचकामी ठरले आहे. गेली अनेक वर्षे आपण नुसते परीक्षार्थी शिक्षण म्हणून चर्चा करीत आहोत हे जाणवले. आता आपल्याला शिक्षणप्रणालीत मूळापासून बदल करण्यासाठी संधी दार ठोठावते आहे व यात बदल करून योग्य निर्णय घेण्याची वेळ आली आहे. नवीन शैक्षणिक धोरण नुकतेच जाहीर झाले आहे. त्यामुळे या अनुषंगाने या नवीन धोरणात आवश्यक ते बदल शिक्षण प्रणालीत आपण करू शकणार आहोत. कोविड काळातील उणीवांचा अभ्यास केल्यास नवीन शैक्षणिक धोरणानुसार आखलेल्या ५+३+३+४ या स्तरावर पुढील प्रमाणे बदल अपेक्षित झाले आहे. डिजिटल क्षमता, आभासी शिक्षण, पायाभूत अभ्यासक्रम, कौशल्य शिक्षण, मानसिक क्षमता, मूल्यमापन केंद्र, गृहशाळा या सात मुद्द्यांवर भर दिला गेला तरच शिक्षणामधून आपला भविष्यकाळ उत्तम असेल याची खात्री वाटते. याकरिता मात्र सामूहिक जबाबदारी ची व सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. अशा अनुषंगाने हा अंक आपल्या हाती देण्यात आनंद होत आहे....

**प्रा.डॉ. सुपर्णा देशमुख**

संपादक, अमोलक कोरोना विशेषांक,

२०२१-२२

गांधी महाविद्यालय, कडा

INTELLECTUAL PROPERTY INDIA
PATENTS | DESIGNS | TRADE MARKS
GEOGRAPHICAL INDICATIONS

सत्यमेव जयते

NIPAM
NATIONAL IP AWARENESS MISSION

Government of India
Ministry of Commerce and Industry
Department for Promotion of Industry and Internal Trade
Office of the Controller General of Patents, Designs and Trade Marks

# CERTIFICATE OF APPRECIATION

***Presented to***

## SMT. S. K. GANDHI ARTS, AMOLAK SCIENCE & P.H. GANDHI COMMERCE COLLEGE, KADA, DIST - BEED (M.S.)

*In recognition of active participation in the* ***National Intellectual Property Awareness Mission (NIPAM)*** *launched by the Government of India on the occasion of the 75th anniversary of independence under the banner "Azadi Ka Amrit Mahotsav" to create widespread awareness on Intellectual Property Rights (IPR). The exceptional contribution in successfully organizing the awareness programme on* ***December 15, 2021*** *in association with* ***Intellectual Property Office, Mumbai*** *by providing your valuable time and support is highly appreciated.*

*Solicit your continued support for outreach of IPR far and wide.*

**Date:January 26, 2022**

(RAJENDRA RATNOO, IAS)
CONTROLLER GENERAL OF
PATENTS, DESIGNS & TRADE MARKS

# श्री. अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ,

## ✻ विश्वस्त मंडळ ✻



**श्री. गोकुळदासजी मेहेर**
विश्वस्त अध्यक्ष



**श्री. बाबुलालजी भंडारी**
विश्वस्त अध्यक्ष



**श्री. दिलीपकुमारजी बाफना**
विश्वस्त अध्यक्ष



**श्री. पोपटलालजी भळगट**
विश्वस्त अध्यक्ष



**श्री. दिलीपकुमारजी पटवा**
विश्वस्त अध्यक्ष

## ✻ कार्यकारी मंडळ ✻



**श्री. कांतीलालजी चाणोदिया**
अध्यक्ष



**श्री. योगेशकुमारजी भंडारी**
कार्याध्यक्ष



**श्री. अनिलकुमारजी झाडमुथ्था**
उपाध्यक्ष



**श्री. हेमंतकुमारजी पोखरणा**
प्रधानमंत्री



**श्री. बिपीनकुमारजी भंडारी**
मानद मंत्री



**श्री. विनोदकुमारजी बलदोटा**
मानदमंत्री



**डॉ. उमेशकुमारजी गांधी**
कोषाध्यक्ष



**श्री. रमेशलालजी गुगळे**
कार्यकारी सदस्य

# श्री. अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ,

## ✻ कार्यकारी मंडळ ✻


डॉ. महेंद्रकुमारजी पटवा
कार्यकारी सदस्य


श्री. संजयकुमारजी मेहेर
कार्यकारी सदस्य


श्री. योगेशकुमारजी चाणोदिया
कार्यकारी सदस्य


श्री. संजयकुमारजी कोठारी
कार्यकारी सदस्य


डॉ. प्रमोदकुमारजी भळगट
कार्यकारी सदस्य


श्री. प्रफुलकुमारजी पोखर्णा
कार्यकारी सदस्य


श्री. संजयकुमारजी भंडारी
कार्यकारी सदस्य


श्री. संतोषलालजी गांधी
कार्यकारी सदस्य


श्री. अमोलकुमारजी पटवा
कार्यकारी सदस्य


श्री. वसंतलालजी चोरबेले
कार्यकारी सदस्य


श्री. अनिललालजी मेहेर
कार्यकारी सदस्य


श्री. अजयकुमारजी चोरबेले
कार्यकारी सदस्य


श्री. ललीतकुमारजी कटारिया
कार्यकारी सदस्य

## श्री. अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ,

### ❋ संपादक मंडळ ❋



प्राचार्य डॉ. एन.एस राठी
अध्यक्ष



उपप्राचार्य डॉ. ज.मो. भंडारी



प्रा.डॉ. सुपर्णा देशमुख
संपादक



प्रा. सुनिता बोम्बे
सदस्य



प्रा.डॉ. योगेश रसाळ
सदस्य



प्राचार्य डॉ. एन.एस राठी, उपप्राचार्य डॉ. ज.मो. भंडारी व सर्व कर्मचारी वृंद

# ✻ महाविद्यालयीन उपक्रम ✻



राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त अभिवादन करतांना प्राचार्य डॉ. एन.एस. राठी, उपप्राचार्य डॉ. भंडारी जे.एम. व इतर.




राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त अभिवादन करतांना प्राचार्य डॉ. एन.एस. राठी, उपप्राचार्य डॉ. भंडारी जे.एम. व सर्व स्टाफ



राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी शिबीरांतर्गत व्याख्यान



राष्ट्रीय सेवा योजना शिबिरांतर्गत ग्रामस्वच्छता.



राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी शिबीरांतर्गत डॉ. अभय शिंदे यांचे व्याख्यान



राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन

# ❊ महाविद्यालयीन उपक्रम ❊



८ मार्च जागतिक महिला दिन निमित्त डॉ. मनिषा शिंदे आरोग्य अधिकारी विद्यार्थीनी व कर्मचारी वृंद




८ मार्च जागतिक महिला दिन निमित्त डॉ. मनिषा शिंदे आरोग्य अधिकारी प्राचार्य डॉ. एन.एस. राठी, उपप्राचार्य डॉ. भंडारी जे.एम. नॅक समन्वयक श्री. नरेंद्र गवळी व कर्मचारी वृंद



डॉ. सय्यद अझरुद्दिन विभाग प्रमुख वाणिज्य विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांची महाविद्यालयास भेट




गांधी महाविद्यालय व श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान यांचे कोविड केअर सेंटर




मराठी भाषा संवर्धन पंधरवडा.. प्रमुख वक्ते व उद्घाटक प्रा डॉ दिनेश काळे, गार्सिया महाविद्यालय, वसई, मुंबई, ऑनलाइन व्याख्यान २५ जानेवारी २०२२





रोल ऑफ बायो फर्टिलायझर्स वनस्पती शास्त्र विभागातर्फे आयोजित वेबिनार प्रमुख पाहुणे प्रा. सी. मनोहराचारी व प्रा. ए.बी. अडे यांचे व्याख्यान

## ✻ महाविद्यालयीन उपक्रम ✻




लायब्ररी विभागातर्फे एक दिवसीय वेबीनारमध्ये
श्री. शरद पाटील यांचे ऑनलाईन व्याख्यान



पदार्थ विज्ञान विभागतर्फे राष्ट्रीय वेबीनारमध्ये
डॉ. अजय ठाकुर, (ACIPR) व प्राचार्य डॉ. संजय चाकणे
(MC सदस्य), पुणे विद्यापीठ, पुणे यांचे मार्गदर्शन लाभले



छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक दिन
प्रसंगी ६ जून २०२२ रोजी संस्थेचे सर्व पदाधिकारी
विद्यार्थी व कर्मचारी वृंद



छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक दिन
प्रसंगी ६ जून २०२२ रोजी महिला कर्मचारी वृंद



छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक दिन
प्रसंगी ६ जून २०२२ रोजी आयोजित रांगोळी स्पर्धा



राष्ट्रीय युवा दिवसानिमित्त डॉ. रविंद्र पाटील
यांचे ऑनलाईन व्याख्यान दि. १३ जानेवारी २०२२

## ❋ महाविद्यालयीन उपक्रम ❋




२२ नोव्हेंबर २०२१ रोजी कोविड लसीकरण मोहिम उद्घाटन सोहळ्या समयी डॉ. जयश्री शिंदे आरोग्य अधिकारी, आष्टी व संस्थेचे सर्व पदाधिकारी




कोविड लसीकरण मोहिम



३ जानेवारी २०२२ सावित्रीबाई फुले जयंती निमित्त डॉ. मधुश्री सावजी यांचे ऑनलाईन व्याख्यान



कोरोना एक मुक्त संवाद रसायनशास्त्र विभागतर्फे आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय वेबीनार डॉ. धनंजय वारे, व डॉ. ईश्वर कणसे यांचे ऑनलाईन मार्गदर्शन




राजमाता जिजाऊ जयंती निमित्त डॉ. स्मिता शिंदे स.भु. महाविद्यालय, औरंगाबाद यांचे इतिहास विभागाने आयोजित केलेले ऑनलाईन व्याख्यान



मराठी राजभाषा गौरव दिन २६ फेब्रुवारी २०२२ मराठी विभागातर्फे आयोजित डॉ. पंडित शिंदे यांचे ऑनलाईन व्याख्यान

# ✻ महाविद्यालयीन उपक्रम ✻




आंतरराष्ट्रीय योगा दिन २१ जून २०२१ रोजी ऑनलाईन योगाचे मार्गदर्शन प्रा.डॉ. सुपर्णा देशमुख



गांधी महाविद्यालयास एम.आय.टी. महाविद्यालय पुणे येथे बास्केट बॉल स्पर्धेमध्ये आंतर महाविद्यालयीन विजेतेपद




विद्यापीठ वर्धापन दिन




कृषी दिन




अमोलक ऋषी म.सा. पुण्यतिथी



आण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी

## ✲ गुणवंत विद्यार्थी २०२१-२२ ✲



सय्यद अफताब जमीर
प्रथम क्रमांक B.A



शिंदे वैष्णवी
द्वितीय क्रमांक B.A



शेख सुरैय्या
तृतीय क्रमांक B.A



प्रियंका पोखरणा
प्रथम क्रमांक B.Sc.



सिमरन सय्यद
द्वितीय क्रमांक B.Sc.



सना सय्यद
तृतीय क्रमांक B.Sc.



राणेजा ऋतुजा
प्रथम क्रमांक B.Com



मोरे प्रणाली
द्वितीय क्रमांक B.Com



तांदळे दिपक
तृतीय क्रमांक B.Com



मुनोत महावीर प्रकाश
प्रथम क्रमांक B.C.A.



कोल्हे शुभम
द्वितीय क्रमांक B.C.A.



एकशिंगे कांचन
तृतीय क्रमांक B.C.A.

## ❋ विशेष उल्लेखनीय ❋



मयूर रमेश पवळ PSI पदी नियुक्ती ८/३/२०२२



मुकूंद ढोबळे PSI पदी नियुक्ती ८/३/२०२२

श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त अध्यक्ष गोकुळदासजी मेहेर मा अध्यक्ष कांतिलालजी चाणोदिया सचिव मा हेमंत कुमारजी पोखरणा, महाविद्यालये प्राचार्य मा एन एस राठी, उपप्राचार्य डॉ जे एम भंडारी, सत्कार करताना



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिकचे कुलगुरू डॉ ई. वायुनंदन यांचेकडून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे अभ्यास केंद्राचे मान्यता पत्र स्वीकारताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एन एस राठी, समवेत डॉ धनंजय माने, डॉ प्रकाश देशमुख व प्रा डॉ अशोक कोरडे



यशवंतराव चव्हाण साहेब यांची जयंती साजरी करताना प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी सर समवेत केंद्र संयोजक डॉ. अशोक कोरडे सर व, डॉ. शिवराज पाताळे, डॉ. सुपर्णा देशमुख, डॉ. सुनिल पंढरे, तंत्रसहायक ज्ञानेश्वर खंदारे इ.



ऑलिम्पिक पटू व अर्जुन ॲवॉर्ड विजेता माजी विद्यार्थी श्री. अविनाश साबळे यांच्या सत्कार समयी श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ संस्थेचे सर्व पदाधिकारी, मा. प्राचार्य व उपप्राचार्य




गांधी महाविद्यालय, कडा व श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान ट्रस्ट तर्फे कोविड केअर सेंटरमध्ये ट्रस्टचे सचिव बाबासाहेब म्हस्के यांच्या तब्येतीची विचारपुस करतांना आमदार मा. सुरेशआण्णा धस

## अनुक्रमणिका


| अ.नं. | लेख | लेखकाचे नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| १ | कोविडने दर्शवला आधार | डॉ. ज. मो. भंडारी | ०६ |
| २ | गरज संयुक्तिक प्रयत्नांची | वैष्णवी शिंदे | ०८ |
| ३ | भविष्यातील महाभयंकर संकटांचे संकेत | महेश पांडुळे | १० |
| ४ | १५ हजार कुटूंबाना थेट मदत जयदत्त क्षिरसागर असाही आधार | विशाल भुजबळ | १३ |
| ५ | जनतेसाठी पाठीराखा, आरोग्याची काळजी वाहनारा | संदेश मुळीक | १४ |
| ६ | कोरोनातील समर्पित सेवा यज्ञ | अक्षय आबदार | १६ |
| ७ | दोन हातांचे देवदूत | प्रणाली मोरे | १८ |
| ८ | खरे कोरोना योध्दा आमदार निलेश लंके | शुभांगी औटी | २० |
| ९ | ओमायक्रॉनची दहशत | ईश्चर सुंब्रे | २२ |
| १० | कोरोनावर किती लसी? | यशोदा भळगट | २४ |
| ११ | कोरोना कोई रोड पर ना आये | सना सय्यद | २५ |
| १२ | कोरोना काळातील बदलाचे वारे | प्रा.डॉ. अशोक कोरडे | २६ |
| १३ | कोरोना सोबत जगतांना... एक संदेश | प्राचार्य डॉ. एन.एस. राठी | २८ |
| १४ | आवश्यक माहिती (संग्रहीत) | नाना पाटेकर | २९ |
| १५ | कोरोना | महेंद्र पेटकर | ३० |
| १६ | कोरोना व्हायरस | प्रा.डॉ. एस.एस. पाताळे | ३२ |
| १७ | श्री अमोलक देवराई पवित्र वनस्वतींची लागवड | प्रा.डॉ. एस.एस. पाताळे | ३६ |

## वार्षिक अहवाल

| अ.नं. | लेख | विभाग प्रमुखाचे नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| १८ | Department of English. | प्रा. नरेंद्र गवळी | ३७ |
| १९ | Department of Geography. | प्रा. उध्दव चव्हाण | ३९ |
| २० | राज्यशास्त्र विभाग / लोकप्रशासन विभाग | प्रा. टि.जी. गोंदकर / डॉ. श्रीकांत मगर | ४० |
| २१ | अर्थशास्त्र विभाग / हिंदी विभाग | डॉ. अशोक कोरडे/डॉ. विष्णु गव्हाणे | ४१ |
| २२ | मराठी विभाग | डॉ. अनिल गर्जे | ४२ |
| २३ | इतिहास विभाग / समाजशास्त्र विभाग | डॉ. नवनाथ विधाते/डॉ. शिवाजी भोसले | ४३ |
| २४ | क्रिडा विभाग / वाणिज्य विभाग | डॉ. सुनिल पंढारे/डॉ. मदन मार्कंडे | ४४ |
| २५ | यशपंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ | डॉ. अशोक कोरडे | ४५ |
| २६ | Department of Mathematics. | डॉ. अरुणा कुलकर्णी | ४६ |
| २७ | Department of Botany. | प्रा. युनुस सय्यद | ४७ |
| २८ | Department of Chemistry. | डॉ. एस. आर. देशमुख | ४८ |
| २९ | Department of Physics. | डॉ. ज.मो. भंडारी | ५० |
| ३० | Department of Zoology. | डॉ. रमेश आबदार | ५२ |
| ३१ | आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग | डॉ. अनिल गर्जे | ५३ |
| ३२ | Bachelor of Computer Application. | प्रा. वाघुले | ५४ |
| ३३ | राष्ट्रीय सेवा योजना | डॉ. विष्णु गव्हाणे | ५५ |

# कोविडने दर्शवला 'आधार'

कोविड काळात अपल्या आरोग्य यंत्रणेतल्या चांगल्या बाबी जाणवल्या आणि उणिवादेखीन आधोरेखित झाल्या. याचे कारण आपल्याकडे अर्थसंकल्प असो वा विधानसभेतील चर्चा, सार्वजनिक आरोगय हा दुर्लक्षित राहिलेला विषय होता. पण आरोग्यसंस्था सक्षम करा, हे कोविडने ठणकावून सांगितले आहे. कोविडसंसर्ग नागरी भागांत अधिक होता आणि तो हाताळणेदेखील गुंतागुंतीचे, आव्हाने ठरले. कोविड काळातील टाळेबंदीमुळे पोषण–समुपदेशन, माध्यान्यभोजन, लसीकरण या सेवांत आणि विविध दुखण्यांवरील उपचारांमध्ये अडथळा आला. दिल्लीस्थित एम्सपासून गावांतील 'आशा' पर्यंत प्राथमिक आरोग्यसेवा देणाऱ्या सर्व संस्थाचे महत्व आणि त्यांच्या मर्यादा हे दोन्ही कोविडकाळात लक्षात आले आहे. त्यामुळे आता समस्या लक्षात घेऊन काही सुधारणा व्हायला हव्यात.

गेल्या ४० वर्षात महाराष्ट्र सरकारचा आरोग्यावरील खर्च राज्यउत्पादनाच्या एक टक्क्यावरुन ०.५ टक्क्यापर्यंत घसरला आहे. त्यामुळे त्यात आता अभूतपूर्व वाढ करण्याची गरज आहे. सध्या केंद्र सरकार आरोग्यावर दर वर्षी दरडोई सरासरी ६०० रुपये, तर राज्य सरकारे सरासरी १,२०० रुपये खर्च करतात. दोन्ही मिळून १,८०० रुपये होतात. जनता आपल्या खिशातून त्याच्या अडीचपटीहून जास्त, म्हणजे दर वर्षी दरडोई सुमारे ४,५०० रुपये खर्च करते. २०१७ साली जाहीर झालेल्या नव्या 'राष्ट्रीय आरोग्य धोरण' त सरकारने जाहीर केले होते की 'सर्वांना आरोग्यसेवा' हे ध्येय २०२५ पर्यंत गाठले जाईल आणि हे ध्येय गाठण्यासाठी सध्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या १.३ टक्के असलेला आरोग्यखर्च २०२५ पर्यंत २.५ टक्के इतका वाढवला जाईल. सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या २.५ टक्के म्हणजे दरडोई सुमारे ४,००० रुपये खर्च करण्याची गरज आहे.

आरोग्य हा राज्य सरकारच्या अखत्यारीतील विषय असल्याने महाराष्ट्र सरकारचा वाटा केंद्र सरकारपेक्षा जास्त, म्हणजे दोनतृतीयांश असायला हवा. २०२५ पर्यंत सरकारी आरोग्यर्ख दरडोई ४,००० रुपये करण्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या सध्याच्या दरडोई १,००० रुपयांवरुन तो २०२५ पर्यंत २,५०० रुपये व्हायला हवा हे ध्येय गाठण्यासाठी सरकारच्या आरोग्यखर्चात अभूतपूर्व अशी–म्हणजे १०० टक्के वाढ करायला हवी. निती आयोगाच्या शिफारसीनुसार, सरकारच्या अर्थसंकल्पात आरोग्याचा वाटा ८% व्हायला हवा. सध्या तो फक्त दोन टक्के किंवा त्याहून कमी आहे. दिल्ली राज्य सरकारने आरोग्यखर्च वाढवून संकल्पाच्या १३ टक्के केला आहे, यीही नोंद घेणे आवश्यक.

याखेरीज 'क्लिनिकल एस्टॅब्शिमेंट ॲक्ट' काही सुधारणांसह महाराष्ट्रात लागु करण्याची गरज कोविडने अधोरेखित केली. जनआरोग्य अभियानाने २०१० पासून याबद्दल प्रयत्न करुन केंद्रिय कायद्यात सुधारणा सुचवत महाराष्ट्राकरीता सुधारित मसुदा सादर केला होता. त्यावर शासनाबरोबर चर्चेच्या काही फेऱ्या होऊन एक मसुदा शासनाच्या कायदे समितीने पारित केला. मात्र २०१४ नंतर त्यावर काहीही निर्णय घेतला गेला नाही. कोविडकाळात मोठ्या व्यापारी रुग्णालयांची कार्यपध्दती उघड झाल्यामुळे अया कायद्याची निकड प्रकर्षाने जाणवली. या कायद्यात काय असावे? तर, रुग्णांच्या हक्कांना मान्यता देत खासगी रुग्णालयांचे प्रभावी नियमन केले जावे. सर्व वैद्यकीय आस्थापनांची नोंदणीआणि तयासाठीची

यंत्रणा विकसित करावी. सर्व वैद्यकिय आस्थापनांची कार्यपध्दती तज्ज्ञांनी बनवलेल्या निकषानुसार असेल, हे बघावे. अनावश्यक उपचार, औषधे, तपासण्या यांना चाप बसवण्यासाठी प्रमाणित उपचार मार्गदर्शिका तयार करावी. रुग्णालयांच्या उपचारदरांचे प्रमाणिकरण केले जावे. त्यात पारदर्शकता आणण्यासाठी प्रातिनिधिक दर रुग्णालयांच्या दर्शनी भागात लावण्याची आणि ते लिखित रुपात रुग्णांना देणे व या नियमाचे उल्लंघन करणाऱ्यास दंडाचीही तरतूद असावी. रुग्णालयांमधील औषधे व उपकरणे यांच्या अवाजवी नफ्यावर नियंत्रण आणणे गरजेचे आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय तक्रारनिवारण यंत्रणा आणि राज्यस्तरीय अपिलीय यंत्रणा निर्माण करावी लागेल. या यंत्रणेत सरकारी अधिकारी, डॉक्टर्सचे प्रतिनिधी यांच्याबरोबर निवृत्त न्यायाधीश, आरोग्यक्षेत्र, सामाजिक संस्था, ग्राहक चळवळ, महिला यांचे प्रतिनिधीत्व असावे. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा व राज्य पातळीवर खास अधिकाऱ्यांची नेमणूक केली जावी. निकष ठरवताना डॉक्टर्स, छोटी रुग्णालये यांच्यावर अन्याय होऊ नये यासाठी त्यांच्या प्रतिनिधींना निकष ठरवणाऱ्या तज्ञ समितीमध्ये सनदेचे पालन करणे आणि सनद दर्शनी भागात लावणे अनिवार्य करावे.

रुग्णहक्क सनदीत रुग्णांच्या पुढील हक्कांचा समावेश असणे अपेक्षित आहे : माहिती तातडीच्या स्थितीत रुग्णाला प्राथमिक वैद्यकीय उपचार मिळणे. उपचारासाठी रुग्णाची माहितीपूर्ण संमती घेणे आवश्यक . अन्य डॉक्टरचे मत–सल्ला (सेकंट ओपिनियन) घेणे पारदर्शन आणि माफक दरात उपचार मिळणे. रुग्णाची गोपनियता, खासगीपणा व मानवी प्रतिष्ठा जपली जाणे. भेदभावरहित उपचार मिळणे. निर्धारित निकषांनुसार सुरक्षित आणि चांगल्या दर्जाची सेवा मिळणे पर्यायी उपचार निवडण्याची मोकळीक असणे औषधदुकान आणि तपासणीकेंद्रे निवडण्याचा हक्क. योग्य रेफरल व रुग्ण हस्तांतरण सेवा मिळणे. क्लिनिकल ट्रायलच्या बाबतीत रुग्णाची सुरक्षितता जपली जाणे. बायोमेडिकल संशोधनाच्या बाबतीत व्यक्तीची सुरक्षितता जपली जाणे. डिस्चार्ज घेता येण्याचा, मृतदेह मिळण्याचा हक्क असावा. तक्रार करणे आणि तिचे निवारण होणे हे हक्कदेखील मिळायला हवेत.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शिकेनुसार दर दहा हजार लोकसंख्येमागे डॉक्टर आणि परिचारिकांचे प्रमाण ४४ असणे आवश्यक आहे. केरळमध्ये हे प्रमाण ६५ असून. ते देशातील एकमेव राज्य आहे. आवश्यकतेपेक्षा कमी मनुष्यबळाचे प्रमाण असणारी भारतातील राज्य आहे. पश्चिम बंगाल २४, तेलंगणा २६, जम्मू काश्मीर २९, आंध्रप्रदेश ३०, तमिळनाडू ३२, उत्तराखंड ३३ आणि दिल्ली ४१ आणि किमान मनुष्यबळाहूनही कमी प्रमाण असलेली राज्ये आहेत. बिहार आणि झारखंड प्रत्येकी १०, ओडिशा १३ आणि दहार हजार लोकसंख्येमागे केवळ आठ डॉक्टर दहा परिचारिका असे देशात सर्वाधिक वैद्यकिय महाविद्यालये केरळनंतर महाराष्ट्रात (५०) आहेत. मात्र डॉक्टर सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत काम करण्यास तयार नाहीत, दरडोई आरोग्यव्यवस्थेवर केला जाणारा अल्प खर्च, कामाचा दर्जा आणि स्वरुप यांमध्ये असलेल्या त्रुटी, उपचार करण्यासाठी आवश्यक औषधांसह साधनांचा अपुरा साठा आणि राहण्यासह कामाच्या ठिकाणी अपुऱ्या सोयीसुविधा या कारणांनी सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत काम करणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे. ही कारणे दूर करणे ही दिर्घ पल्याचे काम आहे.

**शब्दांकन उपप्राचार्य**
**डॉ. ज.मो. भंडारी**

# गरज 'सुंयक्तिक' प्रयत्नांची

कोरोनाच्या काळात आरोग्यक्षेत्र ढवळून निघताना दिसले. एका बाजूला रुग्णालयांमध्ये दिल्या जाणाऱ्या रेमडेसीवर औषधाविषयीचे वादप्रवाद दिसून आले. तर दुसरीकडे नागरीकांनी केलेल्या घरगुती उपायांमुळे कोविड नियंत्रणात राखण्यात यश आले, अशी चर्चाही दिसून आली. अंतिमतः यातून आयुर्वेद की ॲलोपॅथी या जुन्या वादला तोंड फुटले. लेखाच्या सुरुवातीलाच माझे एक मत स्पष्ट करतो की जसे ॲलोपॅथीचा कोणी एक मालक नाही तसाच आयुर्वेदाच्या बाबतीत आहे.

आयुर्वेद ही निरिक्षणावर आधारीत पध्दती आहे. प्राचीन काळी मनुष्याला होणारे आजार त्यांची नैसर्गिक उगमस्थाने आणि त्या आजारांवर निसर्गामध्येच असणारे उपचार यावर आयुर्वेद विकसित होत गेले. आयुर्वेद हे कोणत्याही एका देशाचे सुध्दा नाही. जपान, दक्षिण कोरिया, व्हिएतनाम, यूरोपियन देश, आफ्रिकन देश तसेच ब्राझील, अर्जेंटिना, पेरु या देशांमध्ये सुध्दा अनेक आजारांवर निसर्गातीलच घटक (जंगलातील वनस्पतीचा पाला, मुळ्यांचा रस, भाजीपाला) यांचा वापर करुन उपचार केले जातात. जापनीज–कोरियन लोक तर रोजच्या जेवणात मासे आणि भाज्यांचा रस घेतात, त्यांचे सरासरी वयोमान ८० वर्षे आहे. मग माशाला सुध्दा आयुर्वेदिक म्हणायचे का? ते मासे खाऊन ८० वर्षे जगतात तर आपण भाजीपाला खाऊन ६० वर्षे. ॲलोपॅथीचा उगम हा सुध्दा नैसर्गिकच आहे. ॲलोपॅथीचे एकही औषध असे नाही की जे नैसर्गिक घटकांपासून बनवले नाही. प्रयोगशाळेत १०० टक्के कृत्रिम असे कोणतेच औषध तयार करता येत नाही. त्याचे काही घटक हे वनस्पती किंवा प्राण्यांपासूनच येतात. एखादा आजार बरा करण्यास मोठ्या प्रमाणात नैसर्गिक पदार्थ घ्यावे लागतात. त्यातील काहीच घटक आजार बरे करु शकतात. मात्र त्यासाठी खूप मोठ्या प्रमाणात नैसर्गिक पदार्थ खावे लागतात. त्यामधील इतर घटक बाजूला करुन फक्त उपयोगी असा अंश बाजूला करुन प्रयोगशाळेतत आहे तसा निर्माण करणे आणि योग्य प्रमाणात शरीरात पाठवणे म्हणजेच ॲलोपॅथी. डॉक्टर रोजच्या रोज जी ॲलोपॅथीची औषधे वापरतात ते सगळे नैसर्गिक स्त्रोतांपासूनच आलेला असतात. शस्त्रक्रिया करतांना रुग्णांना कमी आणि जास्तवेळासाठी जी भूल दिली जाते त्याचे औषध ब्राझीलमधील अमेझॉनच्या जंगलातील वनस्पतींच्या खोडातील रसांपासून केले जाते. आज रोजी जी ॲलोपॅथीची औषधे वेगवेगळ्या आजारांसाठी उपलब्ध आहेत त्याचे मूळ रासायनिक संयुग किंवा अंश हे ७० हजारांहून अधिक वनस्पतींच्या पासून मिळविले आहेत. कॅन्सर वरती वापरली जाणाऱ्या सर्वच औषधांचे मूळ रासायनिक संयुग हे वनस्पतींपासूनच मिळविले आहेत. हे जाणून घेऊन उपचार पध्दतींचा अवलंब करणे मानवाच्या हिताचे आहे.

असे असले तरी आयुर्वेद आणि ॲलोपॅथी या दोन्ही शास्त्रांना मर्यादा आहेत. आयुर्वेद किंवा नैसर्गिक पदार्थ यांचा सर्वच आजारांवर मर्यादित परिणाम दिसून येतो. म्हणूनच ॲलोपॅथीचा उगम झाला. आपल्या बोटाला ब्लेड कापले की आपण लगेच तिथे हळद लावतो. काही वेळातच तेथील रक्त वाहण्याचे थांबते आणि पुढच्या दोन दिवसात झालेली जखम भरून येते. समजा जर आपले बोटेच कापले असेल तर ? त्यावेळी हळदीचा काहीह परिणाम होत नाही. याउलट हळदीचे मूळ रासायनिक गुणधर्म वापरुन ॲलोपॅथीने तयार केली औषधेच परिणामकारक ठरतात. कॅन्सरसारख्या आजार तिसऱ्या किंवा चौथ्या टप्प्यात असताना

समजतो अशा वेळी कोणतीही आयुर्वेदिक औषधे परिणामकारक ठरत नाहीत. एवढेच काय तर ॲलोपॅथीची औषधे सुध्दा ५ ते १० टक्केच परिणामकारकता दाखवतात. जगात कोणताच आयुर्वेदिक किंवा ॲलोपॅथीक डॉक्टर १००% खात्रीने सांगू शकत नाही कि आमची उपचारपध्दती कॅन्सर संपूर्णपणे बरा करते. इथे दोन्ही शास्त्रांच्या मर्यादा स्पष्टपणे दिसून येतात. मुळातच ज्याला आपण आयुर्वेद म्हणतो ते एखादा आजार भविष्यात होऊ नये म्हणून केली जाणारी उपचारपध्दती आहे. समजा ॲलोपॅथीचे औषध घेऊन आपण न्यूमोनिया बरा करु शकतो पण तेच औषध घेऊन भविष्यात होणारा न्यूमोनिया रोखू शकत नाही. यासुध्दा दोन्ही उपचारपध्दतीच्या मर्यादा आहेत.

दुसरा एक मोठा गैरसमज आहे की आयुर्वेदिक औषधांचे कोणतेही दुष्परिणाम (साईड इफेक्ट) नसतात. ते फक्त ॲलोपॅथीक औषधांचेच असतात. हे संपूर्णतः सत्य नाही. संपूर्ण पृथ्वीवर असा कोणताही पदार्थ नाही ज्याचे दुष्परिणाम नाहीत, फक्त त्याची योग्य ती मात्रा ठरवून ते कमी जास्त केले जातात. जसे ॲलोपॅथीक औषधांचे पण तसेच आहे त्यांचे परिणाम जसे वेळाने दिसून येतात त्याच वेळाने त्यांचे दुष्परिणामपण दिसून येतात. दुष्परिणाम खूप वेळाने दिसून आल्यामुळे ते नक्की कशाचे आहेत हे समजून येत नाहीत. उदाहरचच द्यायचे झाले तर जी हळद लावून आपण आपली त्वचा उजळ करतो तीच हळद सतत लावली तर पेशींमध्ये रासायनिक क्रिया करुन पेशींना जखमी करते आणि त्यामुळे काही दिवसांनी अंगाची खाज, त्वचा लाल होणे किंवा सूज येणे असे दुष्परिणाम करते.

आयुर्वेद आणि ॲलोपॅथी यांनी एकत्र येण्याची गरज :

कोव्हीडसारख्या महामारीवर कायस्वरुपी नियंत्रण मिळविण्यासाठी आयुर्वेद आणि ॲलोपॅथी या दोन्ही शास्त्रांनी एकत्र येण्याची गरज आहे. आपल्याकडे याउलट परिस्थिती तयार झाली आहे. चीनमधील शास्त्रज्ञांनी त्यांच्या जंगलात असणाऱ्या औषधी वनस्पतींचे आयुर्वेदिक गुणधर्म मॉडर्न ॲलोपॅथीशी जुळवून मलेरियावरील औषध शोधले आणि त्यासाठी त्यांनी नोबेल पुरस्कार पण मिळवला. आपणसुध्दा या दोन्ही शास्त्रांना एकत्र आणले आणि त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली तर कॅन्सर, मधुमेह यासारख्या आजारांवर कायमस्वरुपी उपाय शोधू शकतो. ॲलोपॅथीचे उपचार ज्या शास्त्रीय कसोटीतून जातात जर आयुर्वेदिक उपचारसुध्दा त्याच करोटीतून गेले तर कदाचित ते ॲलोपॅथीच्या औषधांपेक्षा अधिक उपायकारक ठरतील. पण आयुर्वेदाला मानणारे अशा शास्त्रीय वेळात येणाऱ्या पैशामुळे दोन्ही क्षेत्रातील लोक खोटे दावे करुन कमी वेळा लोकांच्या आरोग्याचा विचार न करता धंदेवाईक झालेत. जसे आयुर्वेदाकडे कॅन्सर, मधुमेह, बॅक्टरीया आणि बुरशीजन्य रोग यावर खात्रीशीर उपाचार नाही तसा तो ॲलोपॅथीकडे पण नाहीत, हे सत्य दोन्ही क्षेत्रांनी स्विकारलेच पाहिजे. दरवर्षी जगभरात एक लाख कोटीपेक्षा अधिक संशोधन निधी हा एकट्या कॅन्सरवरच्या संशोधनाला दिला जातो तरीसुध्दा ॲलोपॅथीकडे कॅन्सरचे १००% हुकमी औषध नाही. तसेच कॅन्सर होणारच नाही याचे १००% हुकमी औषध आयुर्वेदाकडे पण नाही. यावर दोन्ही बाजूंनी विचार केलाच पाहिजे आणि अंतिम सत्य स्विकारलेच पाहिजे.

**वैष्णवी शिंदे**
(T.Y.B.A.)

# भविष्यातील महाभयंकर संकटांचे संकेत

स्विडीश अभ्यासक निक बॉस्ट्रॉम हे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातले मोठे विचारवंत मानले जातात. कृत्रिमरित्या जीवनशास्त्रामधल्या घटकांमध्ये बदल घडवण्याच्या संदीर्भातलं त्यांचं विधन वाचण्यासारखं आहे. नजीकच्या काळात जीवनाशास्त्रामध्ये कृत्रिमरीत्या घडवून आणले जाणारे बदल अस्वस्थ करुन सोडणारे आहेत. आपल्याला नेमके हवे तसे सूक्ष्म जीव तयार करणे आपल्याला शक्य होत चालले आहे. तसेच अनेक साथीच्या आजारांविषयीची बारीकसारीक माहिती जाहिररीत्या उपलब्ध आहे. देवीचा रोग किंवा १९१८ सालची स्पॅनीश फ्ल्यू ची साथ यांना कारणीभूत असलेल्या विषाणूंचा जनुकीय आराखडा कुणीही इंटरनेटवरुन मिळवू शकतं.

न्यूयॉर्कमधील जिनस्पेस किंवा कॅलिफोर्निया मधली बायोक्युरियस यांच्या सारख्या गटांचं मुख्य कामच विज्ञानाविषयी कुतूहल असलेल्या सर्वसामान्य लोकांना जीवशास्त्रामधले निरनिराळे प्रयोग करुन बघणे आणि एकमेकांकडून शिकणे याला मदत करण्याचे आहे. हे काम फक्त सगळ्यांना ज्ञान असलेले प्रयोग करुन बघणे आणि एकमेकांकडून शिकणे याला मदत करण्याचे आहे. हे काम फक्त सगळ्यांना ज्ञात असलेले प्रयोग करुन बघण्यापुरते मर्यादित नसून निर्माण झालेल्या जीवसृष्टीमध्ये कृत्रिमरित्या बदल करुन बघण्याचेही आहे. जीवशास्त्रामध्ये असे प्रयोग करुन बघणारे गमतीने आपल्या अस्तित्वाचा अत्यंत तपशीलवार आराखडा ज्यामध्ये असतो. त्या डिएनए ला जगातली पहिलीवहिली ऑपरेटींग सिस्टिम असे म्हणतात. इथवरच हे न थांबता खरोखरच जशी हॅकर मंडळी संगणकामधील एखादी ऑपरेटींग सिस्टिम हॅक करण्याचा प्रयत्न करतात त्याच धर्तीवर या डीएनए ला हॅक करण्यासाठी अनेक ठिकाणी प्रयोग सुरु आहेत.

कित्येकदा कुठलाही कुटीत हेतु मनात न बाळगता सूक्ष्मी जीवांवर अशा प्रकारे केले जात असलेले प्रयोग अचानकपणे विलक्षण धोकादायक ठरू शकतात. यामुळेच जवळपास दोन दशके लुप्त झालेला स्वाईन फ्ल्यू चा विषाणू १९७७ साली अचानकपणे पुन्हा अवतरला. १९५० च्या दशकापासून प्रयोगशाळेत गोठवण्यात आलेला एक सूक्ष्म जीवीय नमुना एका सर्व सामान्य कर्मचाऱ्याच्या हातून चुकून बाहेर पडल्याचा हा परिणाम असल्याचे नंतर निष्पन्न झाले अशा दुर्घटना नंतर ग्वानारिटो, सार्स अशा विषाणूंच्या बाबतीतही घडल्या. आपल्याला गेल्या दीड वर्षापासून सुन्न करुन सोडलेल्या कोरोना विषाणूच्या बाबतीतही असे काहीतरी घडले असल्याचा संशय वारंवार व्यक्त केला जातो. यामागे चीनचा हात असल्याचेही बोलले जाते. अर्थातच यामधले सत्य पडताळून बघणे तसे सोपे नसल्यामुळे त्याविषयी काही भाष्य करणे कठीण आहे.

सूक्ष्म जीवांसंबंधीचे हे प्रयोग, माणसाच्या डीएनएची तपशीलवार माहिती यांची उपलब्धता इथून पुढे आणखी किती घातक विषाणूंना जन्म देणार आहे हा विचारसुध्दा धडकी भरवणारा आहे. चुकून आणि जाणूनबुजून अशा दोन्ही प्रकारे भरवणारा आहे. चुकून आणि जाणूनबुजून अशा दोन्ही प्रकारे यामुळे जगभरात थैमान घालू शकणारे जिवाणू आणि विषाणू जन्मू शकतात हे निर्विवाद आहे. कुठल्याही पारंपारिक शस्त्रास्त्रांविना आपल्या शत्रूंना जेरीला आणण्यासाठी या सूक्ष्म जीवांचा विचार केला जाऊ शकतो. हे शक्य आहे का याविषयी चर्चा करण्याची गरजसुध्दा नाही. फक्त ते किती सफाईने आणि यशस्वीरित्या जमू शकते एवढाचा त्यामधला प्रश्न आहे.

हे सगळे आपल्याला धक्का देणारे वाटत असले तरी त्याच्या जोडीला आता संगणकशास्त्रामध्ये अत्याधुनिक समजल्या जाणाऱ्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) मशिनलर्निंग (एमएल) बिगडेटा अशा तंत्रज्ञानांची भर पडलेली असल्यामुळे या दोन्हींच्या एकत्रीकरणामुळे काय घडू शकते ही गोष्ट तर अवाक् करुन सोडणारी आहे. या तंत्रज्ञानाचा सोपा अर्थ म्हणजे प्रचंड मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत चाललेल्या माहितीचे विश्लेषण आणि पृथक्करण करुन त्या माहितीच्या आधारेच संगणक आपोआप शिकत जातो. म्हणजेच आपण संगणकाला समजतील असे प्रोग्राम्स लिहून देण्याऐवजी संगणकच स्वतः शिकत राहतो आणि आपल्या कामातल्या चुका कमी करत जातो. यामुळे संगणकाकडून मिळणारे निष्कर्ष अधिकाधिक अचूक होत जातात. याचा परिणाम काय होऊ शकतो?

२००२ साली एकर्ड विमर नावाच्या अभ्यासकाने डीएनएसंबंधीची उपलब्ध असलेली माहिती विकत घेऊन पोलिओच्या रोगाला कारणीभूत असलेल्या जनुकाचा आराखडा तयार करुन दाखवला. तेव्हा या कामाला तीन लाख डॉलर्स एवढा खर्च येत असे. आज यासाठी अगदी किरकोळ खर्च येतो. जगभरात पोलिओचे निर्मूलन करण्यासाठी अब्जावधी डॉलर्स खर्च करण्यात आलेले असले तरी भविष्यात एखादी अतिरेकी संघटना, मानवताविरोधी सरकार किंवा एखादा माणूस वैयक्तिक पातळीवरसुध्दा हळूच हा विषाणू पुन्हा आपल्यावर हल्ला करण्यासाठी सोडू शकतो. इतकेच नव्हे तर एआय आणि संबंधित तंत्रज्ञानाच्या मदतीने पोलिओप्रतिबंधक लसीशी कसे लढायचे, अत्यंत वेगाने हा विषाणू पसरवण्यासाठी काय करायचे, नेमक्या कोणत्या वातावरणात, तापमानात, परिस्थितीत तो जास्त तग धरु शकतो हे ठरवाये अशा गोष्टीही सहजपणे साध्य होऊ शकतात. त्या कशा? एखाद्या विषाणूचा जनुकीय क्रम नेमका कसा आहे, माणसाच्या डीएनएमध्ये बिघाड निर्माण करण्यासाठी आत्तापर्यंतच्या प्रयत्नांचा वापर करुन आपला हल्ला आणखी सुकर कसा करायचा अशा अनेक गोष्टी हल्लेखोर एआयच्या मदतीने शिकू शकतो. जनुकीय अभियांत्रिकीच्या क्षेत्राला प्रशिक्षणानंतर एखादा संगणक आणि पुरेसं आर्थिक पाठबळ यांच्या जोरावर हे साध्य करणं अशक्य नाही.

याची झलक काही वर्षांपूर्वी बघायला मिळाली. 'बर्ड फ्ल्यू' ला कारणीभूत असलेल्या एच फाइव्ह एन वन या विषाणूसंबंधी अमेरिका आणि नेदरलँड्स इथे संयुक्त संशोधन सुरु होते. या विषाणूच्या जनुकीय रचनेमध्ये फक्त चार बदल म्हणजेच 'म्युटेशन्स' घडवून आणून संशोधकांनी हा विषाणू खूप वेगाने पसरवू शकणारा, खूप जास्त घातक आणि माणसाला बाधू शकणारा असा बनवण्यात यश मिळवले तसंच हवेतून त्याचे प्रसरण होऊ शकेल असा भयंकर धोकाही त्यांनी निर्माण केला. यासाठी या विषाणूच्या रचनेत नेकमे कोणते बदल केले पाहिजे हे ठरवणे भाग होते. अर्थातच प्रचंड मोठ्या प्रमाणावर माहिती गोळा करुन तिचे विश्लेषण करणे आणि त्यानुसार घातकता निर्माण करणे याशिवाय हे शक्य नव्हते. एआय आणि त्याच्याशि संबंधित असलेले तंत्रज्ञान यासाठी वापरण्यात आले. आपले निष्कर्ष आणि त्यातून निर्माण झालेल्या महाघातक विषाणूची रचना याविषयीची माहिती छापण्यासाठी संबंधित गट उत्सुक होता. अर्थातच विज्ञानाने पुढे जात रहावे यासाठीच त्यांनी हे करायचे ठरवलेले असले तरी यामुळे जागतिक पातळीवर हाहाकार माजवू शकणारा विषाणू खरोखरच कुणीतरी तयार करुन पसरवू शकेल या भीतीपोटी ही माहिती गुप्त ठेवण्यात आली.

कोरोनाच्या अभूतपूर्व संकटामुळे आपण आपल्या आयुष्यात असे काही बघितले नव्हते आणि इथून पुढे बघणार नाही, असे म्हणजे यातून कोण वाचेल आणि कोण तरेल हे ही कुणीच सांगू शकत नाही. असे असताना आपणच निर्माण केलेल्या जनुकीय आणि एआय या शाखांच्या एकत्र येण्याने पुन्हा लवकरच अशा प्रकारचे महाभयंकर संकट येऊ शकणार नाही असे कसे म्हणणार? याचे कारण म्हणजे हे सगळे उपलब्ध आहे का, हा प्रश्नच नाही. फक्त ते कुणाच्या हाती पडते आणि त्याचा वापर संबंधित मंडळी नेमक्या कशा प्रकारे करतात एवढाच प्रश्न आहे. जसा अणुबॉम्ब केव्हापासूनच तयार आहे, फक्त त्याचा वापर मानवतेच्या नशिबाने केला जात नाहीय, तसाच हा प्रकार आहे. कोरोनामुळे उध्व्दस्त झालेल्या मानवतेसाठी हा आशेचा किरण नक्कीच नाही; पण म्हणून वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करुन कसे चालेल?

**महेश पांडुळे**
(T.Y. B.Sc.)



# १५ हजार कुटूंबाना थेट मदत जयदत्त क्षीरसागरांचा असाही आधार !

कोरोनाच्या लढाईत माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी योग्य वेळी बीड मतदार संघातील ग्रामीण भागात वास्तव्यात असणाऱ्या १५ हजार सामान्य कुटूंबाना एक महिना पुरेल एवढ्या जीवनावश्यक वस्तू च्या किट चे वाटप घर पोहोच केले जात आहे. कोरोनाच्या संकटात माजीमंत्री जयदत्त क्षीरसागराची ही मदत लाखमोलाची ठरणार आहे कारण अनेक दानशूर व्यक्ती नी केलेली मदत संपुष्टात येत असताना ही मदत त्यांच्या कामाला येणार आहे. आज बीड मध्ये माजीमंत्री जयदत्त क्षिरसागर यांनी कोरोनाच्या कठिण परिस्थितीचा सामना करण्यासाठी अत्यंत गरीब कुटूंबाना आधार देण्याचे काम केले, भयावह परिस्थिमध्ये मदतीचा हात पुढे करत बीड मतदार संघातील १५ हजार कुटूंबांना जीवनावश्यक वस्तूची किट वाटप करण्यास सुरुवात झाली आहे. दोन महिन्यांपासून हजारो कामगार, मजूर, सामान्य कुटूंब घरामध्ये बसून आहे, हाताला काम नाही पोट हातावरचे अशा परिस्थितीमध्ये बीड मधील दातृत्व असणारे अनेक हात मदतीसाठी पुढे आले, प्रत्येक जण एकमेकाला या कठिण परिस्थितीमध्ये मदतीचा आधार देत होता. गेली ५० दिवस य मदतीवरच हजारो कुटुंब आपला उदरनिर्वाण भागवत होते मात्र पुन्हा लॉक डाऊन वाढल्याने आता काय खायचे अशी विदारक परिस्थिती निर्माण झाली होती, अशी बिकट परिस्थितीमध्ये माजीमंत्री जयदत्त क्षिरसागर यांनी १५ हजार अत्यंत गरीब अन सामान्य कुटूंबांना एक महिना पुरेल एवढाा जीवनावश्यक वस्तू चे वाटप सुरु केले आहे. क्षिरसागराची ही मदत लॉक डाऊनमुळे जेरीस आलेल्या कठिण परिस्थितीतील कुटूंबाना लाख मोलाची ठरली.

✻ मुख्यमंत्री सहायत्तासाठी ही निधी

मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी कोरोनाच्या लढाईसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी मदत करण्याचे आवाहन केले होते, राज्यभर मोठा प्रतिसाद देत सामान्य नागरीकांनीही यासाठी मदत केली, बीडमध्ये माजीमंत्री जयदत्त क्षिरसागर यांनी आपल्या विविध संस्थेच्या माध्यमातून १० लाख ५०० रु. चा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांच्याकडे सुपूर्द केला होता.

**विशाल भुजबळ**
(S.Y.B.Com)

# जनतेचा पाठीराखा, आरोग्याची काळजी वाहणारा सखा - अमरसिंह पंडित

सामाजिक कार्य म्हटले की बीड जिल्ह्यात काही मोजक्या लोकांची नावे डोळ्यासमोर तरळतात. त्यामध्ये गेवराई तालुक्यातील लोकप्रिय नेते माजी आमदार अमरसिंह पंडित यांचे नाव आघाडीवर आहे. सामुदायिक विवाह सोहळा, शारदा महोत्सव, जलसंधारण, महाआरोग्य शिबीर, नेत्र व कर्करोग निदान शिबीर, राज्यस्तरी कबड्डी स्पर्धा अशा विविध समजपयोगी कार्यक्रम घेऊन अमरसिंह पंडित यांनी शारदा प्रतिष्ठानच्या माध्यमातून दैदिप्यमान काम केले. आपल्या भागासाठी आपल्या माणसासाठी जे जे चांगले ते ते देण्याचे काम करताना त्यांनी कधिच तडजोड केली. जनतेच्या सुखा दुखात धाऊन जाताना त्यांनी लोकांना धिर दिला. नैसर्गिक संकटातही अमरसिंह पंडित सर्वांच्या पाठीशी खंबीर उभा राहिले. गोदावरीला आलेल्या महापुरात गेवराई तालुक्यातील जनता भयभीत झाली होती, त्यावेळी अमरसिंह पंडित यांनी शारदा प्रतिष्ठानच्या माध्यमातून मदत कार्य मोठ्या प्रमाणावर उभा केले. नैसर्गिक संकटात सापडलेल्यांना आर्थिक मदत मिळवून देण्यातही त्यांनी कधीच आपला हात मागे ठेवला नाही. गोरगरीब शेतकऱ्यांच्या मुला–मुलींच्या लग्नाचा प्रश्नही अमरसिंह पंडित यांनी शारदा प्रतिष्ठानच्या माध्यमातून सोडवला. शारदा प्रतिष्ठानच्या बोहल्यावर जन्मोजन्मांसाठी गाठी बांधून हजारो बहिणींच्या कन्यादानाचे पुण्य अमरसिंह पंडित यांच्या पदरात पडले आहे. गेल्या वीस वर्षापासून सामुदायिक विवाह सोहळा अविरतपणे होत होता. परंतु मागील एक वर्षापासुन कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या विवाह सोहळ्याला खंड पडला मात्र अमरसिंह पंडित शांत बसले नाहीत.

कोरोनाच्या काळातही आपल्या भागातील जनतेला धीर देण्याचे काम त्यांनी केले आणि आजही ते करत आहेत. कोरोना रुग्णांवर उपचार होण्यासाठी शासकिय रुग्णालयाला स्वतःच्या खर्चातून व्हेंटिलेटर मशीन उपलब्ध करुन दिल्या. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत सगळा महाराष्ट्र हवालदिल झाला असताना आपल्या माणसासाठी अमरसिंह पंडित पुन्हा उभे राहिले. जय भवानी शिक्षण संकुलात त्यांनी शारदा कोविड केअर सेंटरची स्थापना केली. दोनशे खाटांचे सुसज्ज असे सेंटर त्यांनी सहज स्वखर्चातून उभे केले तसेच त्यामध्ये ऑक्सिजन खाटांचीही व्यवस्था केली. स्वतःच्या खर्चातून कोविड सेंटर उभा करणारे पहिले नेते अमरसिंह पंडित होते. माता–भगिनींचा विशेष विचार करुन महिलासाठी स्पेशल असे कोविड केअर सेंटर गेवराईच्या र.भ. अट्टल महाविद्यालयाच्या वसतिगृहात उभे केले. सतत संपर्क ठेवून त्यांनी सूचना दिल्या. केल्या जाणाऱ्या उपचार आणि सेवावर विशेष लक्ष ठेवले अन्न–पाणी उपचार आदी सुविधा तात्काळ देण्यासाठी त्यांनी जातीने लक्ष घातले कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमध्ये रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत असताना त्याचा ताण शासकिय रुग्णालयात रुग्णालयावर आला होता परंतु अमरसिंह पंडित यांनी कोणत्याही गोष्टीचा विचार न करता शारदा कोविड केअर सेंटर उभारल्यामुळे सरकारी रुग्णालयावरचा ताण कमी झाला आणि दोन हजार पेक्षा जास्त कोविड

रुग्ण यशस्वी उपचार घेऊन तंदुरुस्त होऊन घरी परतले. या भीतीदायक वातावरणात अमरसिंह पंडित यांनी दिलेला धीर गेवराई तालुक्यातील जनता कधीच विसरणार नाही. अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली विजयसिंह पंडित यांनी शारद प्रतिष्ठानच्या माध्यमातून लॉकडाऊनच्या काळात मजूर व गोरगरीबांना मोफत किराणा वाटपकेला, त्यांच्या सहकारी आणि कार्यकर्ते यांनी लोकांना मोफत जेवणाचे डबे पुरवले, राष्ट्रवादी महिला आघाडीच्या सौ. मुक्ता आर्दड यांचे डबे पुरवण्याचे काम उल्लेखनीय आहे अमरसिंह पंडित यांचे मार्गदर्शन त्यांना लाभल्यामुळे त्यांनी हे काम लिलया पार पाडले.

पोस्ट कोविड म्युकरमायकोसिस या रोगाची सर्वत्र भिती निर्माण झाल्यामुळे अमरसिंह पंडित यांनी आरोग्य विभागाशी संपर्क साधून या संकटाशी लढा देण्यासाठी सक्षमपणे नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत. प्लांट उभा करण्यामागे त्यांनी केलेला पाठपुरावा नोंद घेण्यासारखा आहे. आपल्या माणसांना आपल्याच भागात दर्जेदार आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करुन देताना त्यांनी कोणतीही तडजोड केली नाही कसलेही राजकारण केले नाही. सामाजिक वसा घेऊनच त्यांनी हे काम सुरु केले आहे. यापूर्वी देखील गेवराई तालुक्यातील जनतेला महाआरोग्य शिबिर, कर्करोग निदार शिबिर, नेत्र नेत्ररोग निदान शिबिर अशा प्रकारची शिबिरे घेऊन त्यांनी तालुक्यातील जनतेच्या आरोग्याची काळजी घेतली. पंडित परिवारच्या सदस्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने भव्य रक्तदान शिबिरे घेऊन गरजूंना रक्त उपलब्ध करुन दिले आजही देत आहेत.

**संदेश मुळीक**
(M.Sc. I)

---

## प्रारंभ

उगते हुए सुरज से
कोई नही पुछता है
वह क्यों उग रहा है?
चुपचाप बैठने से काम नही चलेगा
तूफ़ान दरवाजे पर आकर खडा है
यह ठीक समय है,
जब आपस में हाथ मिलाया जाए
दिलों से डर को भगाया जाए
शाम जब ढलने लगे
तो वह सब आपस में
मिलकर यह तय करें
घर के बाहर
एक दिया जलाया जाए
हर घर को
हमले से बचाया जाए
कहीं ना कहीं से
प्रारंभ तो करना होगा
भारत का भाग्य बदलना ही होगा
अपना युद्ध खुद लडना ही होगा

*** किरण शिनगिरे**
M.Sc - I Maths

# कोरोनातील समर्पित सेवा यज्ञ

लोकनेते गोपिनाथराव मुंडे साहेबांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजातील वंचित, पिडित घटकांची सेवा करण्यात खर्ची घातले, त्यांच्या ह्याच सेवेचा वसा आणि वारसा पंकजाताई मुंडे आज अतिशय जिकरीने पुढे नेत आहेत. उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही ही लोकनेत्याची शिकवण सदैव अंगी बाळगून त्या करत असलेले काम इतरांच्या तुलनेत नक्कीच काकणभर सरस आहे. मुंडे साहेबांनी आयुष्यभर वंचित, पिडित, उपेक्षित समाजाची जी सेवा केली, त्या सेवेत त्यांच्या निधनानंतरही पंकजाताईंनी कधी खंड पडू दिला नाही. गोपीनाथ मुंडे हे नाव जगाला विसरु देणार नाही, ही शपथ त्या निराधार, उपेक्षित लोकांना मदतीचा हात देऊन त्यांच्यामध्ये जगण्याची एक नवी उमेद गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्या जागवत आहेत. निःस्पृह आणि निस्वार्थ भावनेने केलेली सेवा परमेश्वरा पर्यंत पोचते असे म्हणतात, अगदी तसेच काम पंकजाताई कडून होत आहे. या कामांतून मिळणारे आत्मिक समाधान त्यांना देखील एक प्रकारची उर्जा आणि उत्साह देऊन जाते.

संकट! मग ते नैसर्गिक असो की मानव निर्मित. अशा संकटात खऱ्या अर्थाने पिचला जातो तो गोरगरीब व सर्व सामान्य माणूस...! अशा परिस्थितीत गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान नेहमीच त्यांच्या मदतीला धावून गेलेला आहे. गेल्या पाच-सहा वर्षांच्या कार्यकाळात प्रतिष्ठानने विविध लोकोपयोगी उपक्रमांमधून लाखो लोकांना जगण्याचा आधार दिला, त्यांच्या जीवनात आशेचा किरण प्रज्वलित केला. महा आरोग्य शिबिर, सामुदायिक विवाह सोहळा, ऊसतोड कामगारांच्या पाल्यांना शैक्षणिक मदत, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना मदत, आरोग्य तपासणी, नेत्र शस्त्रक्रिया शिबिर इथपासून ते अपंगांना जयपूर फूट, महिला बचतगटांना भांडवल, त्यांचेसाठी व्यवसाय प्रशिक्षण, सुशिक्षित बेरोजगारांना नोकऱ्या व व्यवसायासाठी मदत, मागासवर्गीय मुलींचे पालकत्व, वैद्यनाथ साखर कारखाना दुर्घटनेतील जखमी व मयत कोरोना संकटात हातावर पोट असणाऱ्या पाच हजार गरजू लोकांना तसेच फ्रंटलाईन वर्कर, हातगाडी व फळ विक्रेते, मंदिरातील पुजारी, होमगार्ड यांना जीवनावश्यक वस्तूंचे किट घरपोहोच रेशन वाटप करणे असो. असा अखंड सेवा यज्ञ गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानचा सातत्याने केलेला आहे.

बीड जिल्ह्यात काही महिन्यांपासून कोरोनाचे गंभीर संकट निर्माण झाले. परळी मतदारसंघातही मध्यंतरी दिवसेंदिवस रुग्णसंख्या वाढत होती. अशा परिस्थितीत जनतेच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचा संकल्प पंकजाताई मुंडे व खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांनी केला. गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान मार्फत सेवा यज्ञ उभारुन त्याद्वारे जनतेला साथ देण्याचे त्यांनी ठरवले. सुक्ष्म लक्षणे असलेल्या कोरोना रुग्णांसाठ त्यांनी शहरातील अक्षता मंगल कार्यालयात स्व. प्रमोदजी महाजन यांच्या पुण्यतिथिला म्हणजे ३ मे रोजी आयसोलेशन (विलगीकरण) सेंटर उभा केले, त्याचबरोबर ज्या घरातील महिला कोरोना बाधित आहेत अशा कुटुंबाना घरपोहोच भोजन व्यवस्थाही

त्यांनी सुरु केली. शिवाय कोरोनामुळे ज्यांचे निधन झाले, त्या घरालाही कुटूंबाच्या परवानगीने तीन दिवस भोजन पुरविण्याचा एक चांगला आदर्श पायंडा त्यांनी पाडला. केवळ आयसोलेशन सेंटर उभारुन त्या थांबल्या नाहीत तर त्याठिकाणी भरती होणाऱ्या रुग्णांची दररोज विचारपूस, त्यांना काय हवे, नको ते पाहणे, त्यांच्या तब्येतेविषयी डॉक्टर्सकडून माहिती घेणे, सकाळचा नाश्ता, सकस ताजा व पौष्टिक आहार, आयुर्वेदिक काढा पुरवणे या सर्वांवर त्या स्वतः देखरेख करत होत्या. स्वतःचे घरचे नातेवाईक घेणार नाहीत त्यापेक्षा जास्त काळती त्यांनी या सेंटरमधील रुग्णांची घेतली. ज्याचा परिणाम एक चांगले व सकारात्मक वातावरण याठिकाणी निर्माण झाले आणि रुग्ण ठणठणीत बरे होऊन सुखरूप आपापल्या घरी पोहोचू लागले. गेल्या महिनाभरात याठिकाणी महिला व पुरुष असे १४१ रुग्ण भरती झाले होते, त्यापैकी ९१ रुग्ण कोरोना मुक्त झाले. केवळ परळीच नाही तर शिरुर कासार येथेही प्रतिष्ठानने शांतीवनच्या सहकार्याने सेवा यज्ञ सुरु केला. इथेही रुग्णांची काळजी चांगल्या प्रकारे घेऊन त्यांना बरे केले. अर्थात या सर्वाच्या मागे प्रतिष्ठानची संपूर्ण टीमचे डॉक्टर्स मंडळी, भाजपचे कार्यकर्ते यांच्या अथक परिश्रमाचे योगदान मोठे आहे, ते विसरता येणार नाही. या सेवा यज्ञात अनेक दानशूर व्यक्तींनी पैसे, वस्तू, औषधी अशा स्वरुपात मदत केली. एकूणच सर्वाच्या सहकार्यातून होत असलेला कोरोना काळातील हा समर्पित सेवा यज्ञ भविष्यातील प्रत्येक संकटात दिशा देणारा ठरणार आहे. असे म्हणावे लागेल.

**अक्षय आबदार**
(S.Y.B.Com)

---

एवढा कठोर झालास तू
तुला वाटेना का रे खंत
का असा भडकलयास तू

काय केला आम्ही कसूर
तुझ्यामुळे देशात माझ्या
उपाशी मरतोय रे मजूर

एकदा माझ्या देशातल्या गरीबाचा विचार कर
जा रे जा कोरोना परतीची वाट धर
परतीची वाट धर




**गणेश रांगोळे**
(F.Y.B.A.)

# दोन हातांचे देवदूत

साधारण फेब्रुवारी २०२० च्या शेवटच्या आठवड्यात, जगात चर्चेचा विषय ठरत असलेल्या कोविडने त्याच्या भीषण मृत्यू तांडवाचे फर्मान भरतात सर्वत्र धाडायला सुरुवात केली. काळजी म्हणून लागोलाग देशात मार्चमध्ये टाळेबंदी लागू झाली. फर्मान सोडल्यानुसार तो आला आणि अप्रिय घटनांचे कडवट घोट या कोरोनाने पळ पळीने देशाच्या घशात ओतण्यास सुरुवात केली. कडक टाळेबंदी असूनही दिवसेंदिवस रुग्ण संख्या आणि त्या प्रमाणात मृत्युची संख्याही वाढत होती. अवघ्या विश्वाला या कोरोना नावाच्या यमदूतांचे विळखा घातला होता. रुग्ण संख्या झपाट्याने वाढत होती, या विचित्र परिस्थितीचा स्वप्नांतदेखील कोणी विचार केला नव्हता. परिणामस्वरुप आरोग्य सेवा अपुरी पडू लागली, लोकांच्या नोकऱ्या गेल्या, अनेकांवर उपाशी दिवस काढण्याची नामुष्की ओढवली. मग स्थलांतर, औषधी बेडस् च्या शोधार्थ चौफेर दाणादाण उडाली. मात्र या यमदूताला धोबीपछाड देण्यासाठी या काळात काही व्यक्ती, संस्था देवदूत म्हणून उदयास आल्या. कोणी रुग्णांची पळापळ टाळण्यासाठी अवाढव्य कोविड सेंटर्स उभारली तर कोणी अडकलेल्या लोकांना दवाखान्यात पाठवून त्यांची मदत केली. याच बरोबर काही सामाजिक संस्थाही या महामारीत सामान्यांना मदत करताना आघाडीवर दिसल्या. यातून एक लक्षात येते की आपल्या देशाची मदत करण्याची जी संस्कृती आहे, तिला अजूनही धक्का बसलेला नाही, आजही ती देण्याची भावना आणि संस्कृती जिवंत आहे, दोन हातांनी एखाद्याने किती द्यावे आणि ते ही निरपेक्ष भावनेने, उद्दामपणाचा लवलेशही न ठेवता आपसूकचं ज्यांना देवदूत म्हणावे. असं आभाळा एवढं काम काहींनी अंगीकारले आणि तडीस नेते. याचीच काही मोजकी उदाहरणे आणि त्यांच्या मोलाच्या कार्याचा हा आढावा.

✲ सोनू सूद :

आज बॉलिवूडमधील अभिनेत्यांबद्दल सामान्य किंवा सजग जनतेचे मत काय आहे हे इथे वेगळे विषद करायला नको. हे जरी असले तरीही बहुतांशी हिंदी, दाक्षिणात्य चित्रपटांत खल भूमिका करणारा सोनू सूद हा अभिनेता लॉकडाऊन नंतर रियल लाईफमध्ये गरजूंचा महानायक म्हणून पुढे आला. लॉकडाऊन नंतर कोविडच्या सावटाखाली असलेल्या जगात, उपासमारी नावाचा एक भस्मासूर स्वतःची वेगळी यादी तयार करायला लागला. या यादीत विशेषतः हातावर पोट असणारा वर्ग, किंवा भविष्याचा रोडमॅप ठरवत, कर्ज घेऊन सुरु केलेले छोटे मोठे व्यवसायिक झळकू लागले. मृत्यु देवता न थकता काम करत होती, निराशेच्या गर्तेत देश बुडाला होता.

या सर्व अराजकतेमध्ये एक आशेचा किरण डोकावू लागला. सोनू सूद. कोणीही न सांगता स्वतःच्या ईच्छा शक्तीच्या जोरावर हा सोनू भारतात कुठेही अडकून पडलेल्या व ईप्सित स्थळी पोहचू पाहणाऱ्या, हतबल झालेल्या लोकांना मदतीचा हात

देत पुढे आला. सोशल मिडीयाचा केलेला साजेसा वापर, ट्विटर, फेसबुक आणि ईतर माध्यमातून हजारोंच्या संख्येने मदतीसाठी येणाऱ्या रिक्वेटस्, त्यांना जमेल तशी वैयक्तिक दिलेली उत्तरं आणि पुढील सुनियोजित व्यवस्था ही थक्क करणारी होती. कुठलाही गदारोळ नाही, अनियमितता नाही, हलगर्जीवणा नाही. या गरजूंची पाठवणी करताना प्रत्येक जातकाची कोविड टेस्ट करणे, प्रवासांत एक वेळचे जेवण, पुरेसे पाणी आणि सुहास्य दिलेल्या शुभेच्छा या देशांत एक प्रकारची पॉजिटिव्हिटी निर्माण करत होत्या. सर्व स्तरांतून सोनूचे कौतूक होत होते, पण तरीही याचे पाय जमिनीवर असल्याचे आपण पाहिले.

कसं केल असेल याने? दुसऱ्या फळीतील कलाकार असलेला सोनू आपण समाजाचे देणं लागतो ही बांधिलकी उरी बाळगून होता, आहे असे म्हणावे लागेल. आपल्या ओंजळीत मावेल तेवढं आपलं. ओंजळ भरून खाली सांडत असेल तर ते इतरांना तेवढं आपलं ओंजळ भरुन खाली सांडत असेल तर ते इतरांना द्यावं हे सोनूने देशाला दाखवून दिले. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेतही याने रेमडीसीवर, अपुरे बेडस्, ऑक्सिजनचा तुटवडा या गोष्टींवर काम केले जमेल तशी मदत केली. देण्याची वृत्ती किंवा संस्कृती आजही टिकवून आहे हे या सुपर हिरोने दाखवून दिले आणि आज याचं नांव कधीही कुठेही आदराने घेतलं जाईल यात शंका नाही. सोनूच्या कार्याला सलाम !

**प्रणाली मोरे**
(T.Y. B.Com)

---

एक दीड वर्ष कोरोनाने तांडव माजवले होते
त्याने त्याच्या कर्तृत्वाने स्वतःचे नाव गाजवले होते...
त्याने परिवारासोबत रहायला शिकवले
बाहेर च्या जगापेक्षा घरात सुख भेटते हे त्याने दाखवले..
कोरोनाने सगळ्यांना फोन लावायला शिकवले
पोरांसाठी कोरोनाने ऑनलाईन शिक्षणाचे रस्ते दाखवले...
कोरोनाने सगळे चांगले केले
पण त्याने माझ्या नातेवाईकांचे जीव घेतले..
तुझ्या एका चुकीमुळे मला खुप राग आला आहे
म्हणून मनुष्य जातीने तुझे अस्तित्व संपवले आहे...



**स्नेहल उदावंत**
(T.Y. B.SC)

# खरे कोरोना योध्दा आमदार निलेशजी लंके

एक सामान्य घरातील होतकरु तरुण, राजकारण त्याहूनही समाजकारणाची आवड असलेले अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्याचे लोकप्रिय आमदार निलेश लंके. आमदार खासदार तर बरेच आहेत पण कमी वयात ज्यांची आज सबंध राज्यात चर्चा आहे ते निलेश लंके. कोविडच्या महामारीज समाजकारणी, राजकीय कार्यकर्ते स्थानिक पातळीवर जमेल तसे मदत कार्य करत होते पण लंके यांचे कार्य थक्क करणारे आहे. आपल्या मतदर संघातील माय बाप जनतेने मतदान स्वरुपात दिलेल्या आशिर्वादातून उतराई होण्यासाठी व त्यांच्या सोयीसठी लंके यांनी ११०० बेडस् असलेले एक अद्यावत कोविड सेंटर पारनेर जवळील भाळवणी येथे सुरु केले. मोठा आवाका असलेल्या या सेंटरमध्ये १०० ऑक्सिजन बेडस्, रुग्णांची खाण्यापिण्याची  सोय, २४ तास हजर असलेली डॉक्टरांची टिम, औषधांची व्यवस्था आणि विशेषतः रुग्णांच्या मनोरंजनासाठी आयोजित केलेले कार्यक्रम याची रेलचेल होती. लंके स्वतः २४ तास तिथे जातीने हजर राहून सामान्य कार्यकत्यासारखे काम करताना दिसून आले. कोरोनाच्या भीतीने गाळण डाली असताना, अपुरी आरोग्यसेवा असताना, लंके यांच्या या कोविड सेंटरमुळे पारनेर आणि परगण्यातल जनतेच्या चेहऱ्यावर हसू फुलू लागले.

लंके यांनी या नेक कार्यासाठी लोकवर्गणी उभारली, लोकांनीही सढळ हस्ते मदत केली. ईतकेच नाही तर इंग्लंड, पॅरिस, दुबई, अमेरीका, फ्रांस या देशातूनही यांना आर्थिक मदतीचा ओघ येत राहिला. दुर्दम्य ईच्छाशक्तीच्या आधारावर लंके यांनी कोरोनाला गुडघे टेकायला भाग पाडले होते. यांच्या कार्याचा गौरव राज्यातील अनेक संस्थांनी तर केलाच पण इंग्लंड येथील वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, असा पुरस्कार प्राप्त करणारे लंके हे देशातील एकमेव आमदार आहेत. परमार्थाची बीजे ही महाराष्ट्राच्या पावन भूमीत आजही घट्ट रुजलेली आहेत. याचे उदाहरण लंके सारख्या अनेकांनी राज्यासमोर ठेवले. निलेश लंके यांच्या इच्छाशक्तीची दाद द्यावी तेवढी कमीच.


राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती :

आरएसएस या राष्ट्रीय संघटनेचे सामाजिक कार्य लिहायचे ठरविल्यास एक मोठे पुस्तक लिहावे लागेल. पूरस्थिती, दरड कोसळणे, दुष्काळग्रस्त लोकांना मदत वगैरे कुठलीही नैसर्गिक आपत्ती असो संघाचे स्वयंसेवक सर्वात प्रथम तिर्थ मदतकार्याला हजर असतात. निस्वार्थ भावनेने मदत करत असलेली संघाखेरीज दुसरी कुठलीही संघटना असेल असे वाटत नाही. कोविडच्या महामारीत संघाच्या जनकल्याण समिती या उप-संस्थेच्या अंतर्गत पुणे शहरातील विविध भागात १० कोविंड सेंटर उभी राहिली होती. सर्व सोयींनी सज्ज अशी ही विनामूल्य सेंटर्स ५००० रुग्णांना संजीवनी देवून गेली.

कोविडच्या विरोधत कंबर कसून या समितीने वॉर रूम, गरजूंसाठी हेल्पलाईन चालू केल्या, ज्या अंतर्गत लोकांना, बेडस्ची रक्ताची, औषधांची उपलब्धता कळवली जाई. तसेच पूर्ण महाराष्ट्रात मिळून या समिती मार्फत ८० लाख गरजूंची विविध प्रकारे मदत केली. यामध्ये धान्य, खाद्य पदार्थांची पाकिटे, औषधी पुरविणे अशी कामे हिरीरीने लोकांच्या कोविड देशाने पहिली. सांघिक शक्ती काय करु शकते, निस्वार्थ भावनेने समाजकारणाची चळवळ कशी सुयोग्य पध्दतीने राबविली जाते याचे हे एक उत्तम उदाहरण म्हणता येईल. कुठे मोठेपणा नाही की कुठला बडेजाव नाही. परोपकारी वृत्तीची कास धरत ही समिती सेवा सर्वोपरी या उक्तीनुसार सतत कार्यमग्न असते. जनकल्याण समिती किंवा संघ वसूधैव कुटूंबकम म्हणत देशात किंवा जगात जिथेही यांची शाखा किंवा उपस्थिती आहे तेथे अशा सेवा देण्यात अग्रेसर राहिली आहे तर वर नमूद केल्याप्रमाणे, अनेक धुरीणांनी, सेवाभावी संस्थांनी या कल्याणकारी कामात यथाशक्ती मदत केली, मोलाचा वाटा उचलला. राज्य आणि देशाची परोपकारी वृत्ती, निःस्वार्थ सेवेची भावना ही या सर्वांमुळे ठळक होते. या देवदूतांची दानशूरता पाहून शेवटी म्हणावसं वाटतं देता देईल दोन करांनी किती घेशील तू दोन करांनी किती घेशील तू दोन करांनी

**शुभांगी औटी**
(S.Y. B.Sc.)





# ओमायक्रॉनची दहशत

तो परत आलाय. यावेळी नवं रूप घेऊन आलाय आणि आणखी धोकादायक बनून आलाय...

असं कोरोना चा नवा व्हेरिएंट असलेल्या ओमायक्रॉन बद्दल म्हटलं जातंय. या व्हेरिएंट ने सध्या सगळ्या जगात चिंतेचं वातावरण पसरवलंय. नोव्हेंबर महिन्यात दक्षिण आफ्रिकेत सापडलेला व्हेरिएंट काही महिन्यांपूर्वी जगभर धुमाकूळ घालणाऱ्या डेल्टा व्हेरिएंट पेक्षाही जास्त घातक आणि जीवघेणा ठरेल, अशी चर्चा सुरू आहे. त्यामुळे या व्हेरिएंट ची पहिली बातमी येताच अमेरिका- भारतासहित जगभरचे शेअरबाजार कोसळले. आरोग्य यंत्रणा सावध झाल्या. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (WHO) ने याला व्हेरिएंट ऑफ कन्सर्न म्हणजे जक्षाच्या दृष्टीने धोकादायक विषाणू प्रकार म्हणून घोषित केलंय.

दक्षिण आफ्रिकेत लसीकरणाचे प्रमाण जेमतेम २५ टक्के आहे. त्यांच्याहीपेक्षा कमी आफ्रिकेतील इतर देशांत आहे. काही देशांत ते पाच-सहा टक्कयांच्या पुढे गेलेलं नाही. या देशांतील आरोग्य क्षमताही पुरेशी सक्षम नाही. परिणामी, ओमायक्रॉन मुळे कोरोना ची नवी लाट आली तर ती जगभर पसरायला वेळ लागणार नाही असं तज्ज्ञांचं मत आहे.

ओमायक्रॉन चे जगभरात ३० नोव्हेबर २०२१ पर्यंत फक्त १६० रूग्ण आढळलेत. भारतात तोपर्यंत (३०नोव्हेंबर) एकही रूग्ण सापडलेला नाही. मात्र भारतासह सगळेच देश काळजी घेत आहेत. अनेक देशांनी दक्षिण आफ्रिकेतून येणाऱ्या विमानांवर बंदी घातलीय, तर बहुतेक देशांनी विदेशातून येणाऱ्या प्रवाशांवर कठोर निर्बंध लादून त्यांची कडक तपासणी सुरू केलीय. भारत सरकारने ओमायक्रॉन च्या संकटाचं गांभीर्य लक्षात घेत ओमायक्रॉन विषयी सावधगिरीचा इशारा देत थकज ने जी प्राथमिक माहिती जाहिर केलीय त्यानुसार-सुरूवातीच्या पुराव्यात असं आढळलंय की पूवी कोरोना बाधित झालेलेही ओकायक्रॉन मुळे पुन्हा संक्रमित होऊ शकतात. डेल्टा अथवा इतर व्हेरिएंट च्या तुलनेत ओमायक्रॉन अद्याप स्पष्ट झालेलं नाही. आतापर्यंत आरटीपीसीआर चाचण्यांच्या आधारावरच ओमायक्रॉन व्हेरिएंट ची लागण झालीय की नाही ते समोर येतंय.

ओमायक्रॉन चा कोरोना प्रतिबंधक लसीवर काय परिणाम होतो, हे शोधण्यासाठी सध्या काम करतेय .

ओमायक्रॉन च्या सक्रमणामुळे अधिक गंभीर आजार होऊ शकतात. की नाही याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. तसंच ओमायक्रॉनन ची वेगळी लक्षणं असल्याचंही स्पष्ट झालेलं नाही.

दक्षिण आफ्रिकामधील रूग्णालयात दाखल होणाऱ्या रूग्णांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाल्याचं सुरूवातीच्या आकडेवारीवरून स्पष्ट झालं असंल तरी फक्त ओमायक्रॉन मुळेच रूग्णांची संख्या वाढत असल्याचा निष्कर्ष निघालेला नाही.

ओमायक्रॉन चं गांभीर्य समजण्यासाठी आणखी

काही दिवस अुवा आठवडे लागू शकतात.

ओमायक्रॉनची जगाला इतकी धास्ती का आहे याबद्दल बोलताना कोव्हिशिल्ड या कोरोना वरील लशीवर संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांच्या चमूत असलेले इंग्लंमधील ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी तील मेडिकल सायन्स डिव्हिजन चे मेरी–क्युरी फेलोशिप विजेते शास्त्रज्ञ  डॉ. नानासाहेब थोरात सांगतात, ओमायक्रॉन व्हेरिएंट ची भारतच नव्हे तर जगभर दहशत असण्याचं कारण म्हणजे तो आफ्रिकेत सापडलाय. आफ्रिकन व्हेरिएंट हे साधारणपणे अधिक पॉवरफु ल असतात. भारतात डेल्टा व्हेरिएंट ने दुसरी लाट आणली होती. ओमायक्रॉन हा डेल्टा पेक्षा ३० पटीने जास्त पॉवरफुल आहे. भारतीयांना ओमायक्रॉन पासून घाबरण्याचं आणखी एक कारण म्हणजे देशात लस न घेतलेल्यांचं प्रमाण खूप मोठ आहे. त्यांना ओमायक्रॉन आपलं सावज बनवू शकतो. दुसरं असं की आधीच्या लाटांमुळे आपल्याला हर्ड इम्यंनिटी आली असं मानलं तरी ओमायक्रॉन अधिक पॉवरफुल असल्याने हर्ड इम्युनिटी ला बायपास करतोय. आफ्रिकेमध्ये हे दिसून आलंय. लशीचे दोन डोस घेतलेल्यांमध्येही ओमायक्रॉनची अवलंबून आहे. साधारणपणे तरूणांना याचा कमी फटका बसेल. परंतू सर्वांनीच खरबरदारी घेणं आवश्यक आहे. या नव्या व्हेरिएंटची थोडीफार भीती बाळगलीच पाहिजे.

ओमायक्रॉन ने शास्त्रज्ञांनाही चकित केलंय. या व्हेरिएंट मध्ये ५० म्युटेशन झाली असून त्यातील ३० म्युटेशन त्याच्या स्पाईक प्रोटीन मध्ये झाल्याचं दक्षिण आफ्रिकेतील शास्त्रज्ञांना आढळलंय (भारतात थैमान घालणाऱ्या डेल्टा व्हेरिएंट मध्ये याहून निम्मी म्युटेशन ही झाली नव्हती.) महाराष्टाचे राज्य सर्वक्षण अधिकारी डॉ. प्रदीप आवटे चित्रलेखा ला सांगतात या म्युटेशन किंवा बदलामुळे त्याला नक्की कोणते नवे गुणधर्म तीन प्रकारचे असू शकतात. १) त्याच्या संक्रमणाचा वेग वाढणं. २) त्यांच्यामुळे होणाऱ्या आजाराची तीव्रता वाढणं. ३) लस घेऊनही किंवा पूर्वी झालेल्या संक्रमणामुळे प्रतिकारशक्ती तयार झाली असूनही तिला चकवा देऊन व्हेरिएंट शरीरात घुसणं. मात्र सध्या याबद्दल खात्रीलायक माहिती नाही. फक्त या व्हेरिएंटचा संक्रमणाचा वेग जास्त आहे. एवढीच माहिती सध्या उपलब्ध आहे. आणखी एक–दोन आठवडे या व्हेरिएंट चा सखोल अभ्यास केल्यानंतरच त्याचा जगाला खरोखरच किती धोका आहे. याची कल्पना येईल

**ईश्वर सुंब्रे**
(M.Sc. I)

# कोरोनावर किती लसी ?

गेल्या वर्षी मार्च महिन्यात कोरोना आल्यानंत जगभराचे शास्त्रज्ञ कोरोना लस बनवायच्या कामाला तातडीने लागले आणि सहा-सात महिन्यांतच कोरोना ची पहिली लस तयार झाली. सध्या जगात नऊ कोरोना लशी उपलब्ध आहेत. त्यामध्ये भारताच्या पुण्याच्या सीरम इन्स्टिटयूट ची कोव्हिशिल्ड हैदराबादच्या भारत बायोटेक ची

कोव्हॅक्सिन आणि अहमदाबादच्या झायडस कॅडिला ची झायकोव्ह-डी या तीन लशीचा समावेश आहे. यातील कोव्हिशिल्ड चं संशोधन ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी ने केलंय. उर्वरित दोन भारतीय बनावटीच्या आहेत.

भारतीय लशीव्यतिरिक्त यूके मधील ऑक्सफर्ड ॲस्ट्राझेनेका रशियाची स्पुटनिक चीनची सिनाव्हॅक आणि नोव्हाव्हॅक अमेरिकेतील मॉडर्ना जान्सेन फायझर/ बायोएनटेक चा समावेश आहे. यात सगळयात जास्त परिणामकारक लस फायझर ची समजली जातेय. त्यानंतर ऑक्सफर्ड ॲस्ट्राझेनेका चा नंबर लागतो. संपूर्ण भारतीय बनावटीची कोव्हॅक्सिन केवळ ५० टक्के परिणामकारक असल्याचं नुकतंच थकज ने जाहीर केलंय.

ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी मधील डॉ. नानासाहेब थोरात सांगतात, आणखी २४० कोरोना लसी प्री - क्लिनिकल ट्रायल मध्ये आहेत. पन्नस टक्के लशीची ॲनिमल ट्रायल सुरू आहे. तर २० लशीची फेज-वन आणि फेज-टू टप्प्यातील हयुमन ट्रायल सुरू आहे. काही कंपन्या कोरोना वर गोळयाही (पिल) आणत आहेत. ॲस्ट्राझेनेका कंपनीने नुकतंच जाहीर केलंय की ती कोरोनाच्या सुपर स्टेनवर लस आणणार आहे! ही लस कितीही शक्तिशाली व्हायरस आला, तरी त्यावर परिणामकारक ठरतील अशा लस करणार असल्याचीही घोषणा काही कंपन्यांनी केलीय.

मात्र लस घेणं महत्त्वाचं असलं तरी तो काही शेवटचा उपाय नाही, असं मत व्यक्त करत डॉ. नानासाहेब थोरात सांगतात, लस घेऊन शरीराचा किती खुळखुळा करणार? शरीराच्या इम्युनिटी शी किती छेडछाड करणार? याचे दुष्परिणाम भविष्यात दिसणारच! म्हणून ठराविक लशी तयार होऊन ठराविका मर्यादेतच त्या घ्यायला हव्यात. लस नव्हे, तर खबरदारी हाच इलाज आहे.

ही आपण घेतलेली खबरदारीच तिसऱ्या लाटेला रोखणार!

**यशोदा भळगट**
(M.Sc. I)



**श्वास रोखुन धरा धुराळा उडणार आहे**
**आम्ही येत आहोत हीच सुरूवात आहे.**

# KORONA
# Koi Rod Par Na Aaye

**चीन मधुन आलेली ही स्वारी जगासाठी**
**ठरली सगळयात मोठी महामारी**
**खबदारी घेणे हीच आपली जबाबदारी**

विज्ञानाच्या या युगात मानवाला अनेक संकटांना तोंड दयावे लागते याच संकटात भर म्हणजे महामारी होय. कोरोनानी जगातील महामारीचे सर्वात मोठे रूप घेतले आहे. अमेरिका सारखा देश महासत्ता हतबल झाला आहे. कोरोना हा विषाणू पासून तयार झालेला रोग आहे. जो सगळीकडे (Covid 19) म्हणून ओळखला जातो. २०१९ मध्ये चीन च्या वुहान शहरात त्यांची सुरूवात होऊन आजपर्यंत तो जक्षाच्या कानाकोपऱ्यापर्यत पोहोचला व जगातिक महामारीचे रूप घेतले . आजाराच्या सामान्य लक्षनामध्ये उच्थ, ताप, सर्दी, खोकला, श्वास घेण्यात अडथळा यांचा समावेश आहे. प्रचंड थकवा जाणवता कोरोनाची लागन झाल्यापासुन लक्षण दिसण्याचा कालावधी दोन ते चौदा पर्यंत असु शकतो. हा आजार बहुतेक लोकांमध्ये अगदी सौम्य असतो. तर अगदी अल्प प्रमाणात घातक ठरतो. हा विषाणू प्रामुख्याने जवळच्या संपर्कामुळे पसरतो. खोकल्यामुळे शिकल्यामुळे किंवा बोलताना आपल्या थुंकीतुन कोरोना पसरतो. या विषाणू पासून स्वतःदुर ठेवण्यासाठी वारंवार हात धुतले. पाहिजे अत्यावश्यक असत घराच्या बाहेर पडले पाहिजे सरकारने कोरोनाला आटोक्यात आणण्यासाठी लॉकडाऊन म्हणजे बंद ठेवला आहे. या कोरोनामुळे अनेक माणसे मारली गेली. रोजगार बंद झाले व्यवसाय बंद पडले शिक्षणव्यवस्था पर्यटन चित्रपटसृष्टी कृषीव्यवस्था यांच्यावर विपरीत परिणाम झाले. अनेक देश व्यवस्था मंदावल्या.

**सना सय्यद**
(T.Y. B.Sc.)

# कोरोना काळातील बदलाचे वारे

कोरोना व्हायरस हे गेल्या १०० वर्षातील सर्वात मोठ आर्थिक आणि अरोग्य संकट आहे. यामुळे उत्पादक रोजगार आणि लोकाच्या आरोग्यावर अभूतपुर्व नकारात्मक परिणाम झाला आहे. कोरोना व्हायरसच्या सकटांमुळे सध्याच्या काळात जगभरातील तंत्रज्ञान, पुरवठा साखळी, रोजगार आणि भांडवल क्षेत्रावर वाईट परिणाम झाल्याचे निदर्शकास येते, या साथीमुळे आपणास सर्वात मोठी आर्थिक परिक्षा पहावयास मिळतांना दिसून येते. भारतातील अर्थव्यवस्थेवर कोरोना व्हायरसमुळे वेगवेगळया क्षेत्रावर परिणाम झाल्याचे दिसते कोरोना विषाणूमुळे आर्थिक क्षेत्रावर मोठा परिणाम झाला असुन चे अपेक्षित गाठणे कठीण झाले आहे. व्याजदरात कपात केल्यामुळे रेपोरेट ७५ बोर्सस पॉईटले कमी करूण ४.४ वर आणला गेला तर रिव्हर्स रेपो रेट ९० बेसीस पाईटले कमी करूण ४ टक्कयावर आणला आहे.

कोरोना विषाणूच्या वेगाने फैलाव झाल्याने अवघ्या जगावर त्याचे परिणाम झाले. कोविड –१९ ही जगातीक महामारी म्हणून घोषीत झाली संपुर्ण जगात लसीकरण झाले त्यामुळे परिस्थिती बदल्यासाठी लस किती महत्त्वाचे आहे हे लक्षात आले.

१) विषाणूचे प्रसार होत असल्याने राज्य सरकारानी लावलेल्या निर्बंधामुळे सर्वात मोठा परिणाम सेवा क्षेत्रावर झाला. लोंकाच्या कामाच्या ठिकाणी सार्वजनिक वाहनामुळे जात येत नसल्याले बेरोजगारीत वृध्दी झाली. यातच बहुसंख्य रोजगार असंघटीत क्षेत्रातील असंख्याने कामाच्या आभावले लाखो स्थलांतरीत मजुराना त्याच्या मुळगावी परतावे लागले.

२) कोरोनामुळे झालेला आणखी एक बदल म्हणजे अनेक कपन्याला त्याच्या कामकाजात मोठा बदल करावा लागला कोरोनाच्या उद्रेकामुळे सोशल डिस्टार्न्सगच्या नियमाने वर्क फ्राम होत आणि वर्क फ्रॉम लाजीव्हेअरंचा प्रसार झाला. लोकाना प्रत्यक्ष येऊन कामाची नोदनी करावी लागत असल्याने कोव्हीड–१९ पुर्वीही गोष्ट विचाराधीनच नव्हती ही स्थिती सस्था आणि कर्मचाऱ्यांच्या फायदयाची ठरली कारण कंपण्याचा र्खाही कमी झाला. आणि कर्मचाऱ्यांचा प्रवास्तातील वेळ वाचला कर्मचारी बहुतांश वेळ घरीच रहात असल्याने संबधित खर्च कमी झाला.

३) आरोग्य क्षेत्रातील स्थितीही अशीच आहे. कंपण्याची विक्री मोठया प्रमाणात झाली. आरोग्य व फार्मा क्षेत्रातील शेअर्सच्या किंमतीत मोठी वाढ दिसून आली. विषाणूच्या प्रसारापुर्वीही या क्षेत्रात संबाधित दिशेने प्रगती सुरू झाली या घटकाचा परिणाम म्हणून स्टेक होल्डर्स पैकी हेल्थ क्षेत्रावर जास्त लक्ष केंद्रीत झाल्याचे दिसते.

४) कोव्हीड– १९ च्या उद्रेक झाल्याने सरकार आणि मध्यवती बँकाची जगातील मंदिच्या काळापेक्षाही मोठया प्रमाणात प्रोत्साहवर आर्थिक पॅकेज जाहीर केले विकसीत अर्थव्यवस्थेमध्ये तर जवळपास शून्य व्याजदर कपात आले.

हा निर्देशांक सर्वोच्च स्थानावर व्यापार करत असताना दिसल्यामुळे स्टॉक मार्केटमध्येही मजबूत स्थिती दिसली. बाजारात प्रवेश करण्याकरिता खूप कमी मूल्य प्रदान करावे लागत असल्यामुळे गुंतवणूकदारांनी या

संधीचा लाभ घेतला परिणामी बाजारात रिटेल भागीदारीचे प्रमाण लक्षणयरीत्या वाढले.

५. कोरोना १९ या साथीने आपल्याला आर्थिक शहाणपणाचे धडे शिकवले. तुम्ही नियमित गुंतवणूक आणि लिक्विड फंडाद्वारे आर्थिक नियोजन केल्यास अशा प्रकारच्या संकटात मानवाला नेहमीच मदत होते कठीण परिस्थितीवर आपण कशी मात करायची हे यातून शिकता येते. पण त्यासोबतच बाजारातील संधी कशी साधायची हे सुद्धा कळते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हा उत्पन्नाचा अतिरिक्त स्त्रोत असून सुद्धा महागाईवर याद्वारे मात करता येते. आपल्या उत्पन्नाच्या प्राथमिक स्त्रोतापासून ते दुय्यम स्त्रोतापर्यंत नेहमीच एक आपत्कालीन योजना असते.

६.कोरोना काळामध्ये मृत्युदर वाढत असताना गरीब मध्यम आणि श्रीमंत सर्व  वर्गांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागले. आरोग्य विभाग कार्यरत असताना समाजातील विविध घटकांनी पुढे येऊन मदतीचा हात दिला. या मदतीमुळे कोरोनावर काही प्रमाणात मात केली गेली आहे परंतु समाजातील अपप्रवृत्ती सुद्धा माणुसकी सोडून काम करताना दिसून येत होत्या. दवाखाने तुडुंब भरली होती, कोविड सेंटर ही संकल्पना नव्याने निर्माण झाली होती आणि एनजीओ व समाजातील समाजसेवक लोकांचे जीव वाचवताना दिसत होते. अनेक लोकांना अन्न पाणी वस्त्र तसेच आरोग्यासाठी अक्षरशः हाल हाल सहन करावे लागले. सरकार खूप प्रयत्न करून जीव वाचवण्याचे काम करीत असलेली दिसून येत होते. सन २०२० व सन २०२१ कोरोना म्हणून कोरोना वर्ष म्हणून संबोधले गेले.

समारोप : कोरोना विषाणू संसर्गामुळे संपूर्ण जगावर लॉकडाऊन करण्याची अभूतपूर्व अशी वेळ आली. या साथीमुळे जगाच्या व पर्यायाने भारताच्या अर्थकारणावर विपरीत परिणाम झाल्याचे दिसते. भारताची वाटचाल केवळ नियम आणि नियंत्रक यांकडून लोक डाऊन कडे सुरू असतानाच सण २०१९ च्या वर्ष अखेरपासूनच भारताला आर्थिक तोडीचा सामना करावा लागला त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासदरात घट झाली आहे कोरोना काळात सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोणती माणसे आपली हे कळाले कारण या काळामध्ये कोणीच कोणाला मदत करत नव्हते परंतु काही मित्रपरिवार जीव धोक्यात घालून लोकांना वाचवत असल्याचे दिसत होते मी स्वतः वाकी या गावी सुपरवायझर म्हणून एक महिना कोरोना योद्धा म्हणून काम केले अनेक लोकांना मदत केली माझे मित्र आणि त्यांचे कुटुंबीयांना हवी ती मदत पुरवली मित्र परिवारांच्या कुटुंबाला सर्वांनाच कोरोनाचे बाजार झाली होती त्यामध्ये वृद्धांचा मृत्यू झाला त्यावेळी मदत मिळ मदत मिळत नसल्याने फार हाल झाले मित्रांनी फोन करून इतरांना ॲडमिट करण्यासाठी सांगितले मी स्वतःच्या गाडीमध्ये त्यांच्या कुटुंबीयांना औरंगाबाद येथे ॲडमिट केले परंतु बेड काही मिळत नव्हते खूप मोठी रिस्क पण होती मित्रामुळे मी ही पत्करले ते दोघेही मृत्यूपासून वाचले मला अक्षरशः भेटले की आज नतमस्तक होतात असे अविस्मरणीय कार्य देखील करता आले याचा अभिमान वाटतो

**प्रा.डॉ.  अशोक कोरडे**
**केंद्र संयोजक,** YCMOU

# कोरोना सोबत जगतांना... एक संदेश

२०२१–२२ हे शैक्षणिक वर्ष भारताच्या इतिहासातील जागतिक स्तरावर सुवर्णाक्षरांनी कोरुन ठेवावे असे राहिले. कोरोना वरील सापडलेली प्रभावी लस भारताने संपूर्ण जगास पुरविली. या अर्थाने भारताने औषधीशास्त्रात जगावर उमटवलेला ठसा उल्लेखनीय आहे. अनेक जनसामान्यांना जवळील लोकांना, आप्तेष्टांना जीवाला मुकावे लागले आहे. कोरोना विषाणू ने जगभरात भयावह स्तोम माजवले असताना भारताने इतर अनेक देशांना मैत्रीचा हात पुढे करून अनेक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. शासकीय प्राथमिक आरोग्य सुविधा जनसामान्यांपर्यंत पोहोचण्यास आजवर च्या इतिहासात हे पहिलेच वर्ष असावे. भारताने ही परिस्थिती अत्यंत चोखंदळपणे हाताळली.

लॉकडाऊनच्या लवकर अंमलबजावणीमुळे सुरुवातीला रुग्णांच्या दुप्पट होण्याचे प्रमाण कमी झाले आणि गंभीर वैद्यकीय पायाभूत सुविधा वाढवण्यास वेळ मिळाला.

शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांना शिक्षकांनी ओनलाइन मार्गदर्शन केले. वयोगट पाच च्या पुढील सर्व विद्यार्थी ओनलाइन शिक्षण घेण्यासाठी आतूर असलेले निदर्शनास आले.

देशव्यापी लॉकडाऊननंतर, भारतीय अर्थव्यवस्थेला बेरोजगारी आणि आर्थिक वाढीच्या तीव्र घसरणीचा मोठा फटका बसला ..

कोविड लॉकडाऊन मुळे विस्कळीत झालेली अर्थव्यवस्था देखील आज सुस्थितीत आली असून भारताची अर्थव्यवस्था ही अमेरिकन डॉलरच्या विनिमयाच्या दरानुसार २०२२ मध्ये जगातील ५ व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. ही बाब निश्चितच जगातील इतर देशांनी भारताचा आदर्श घेण्यासारखी आहे.

संपूर्ण जग स्तब्ध झाले असताना, सर्व व्यवहार ठप्प झाले असताना, अत्यंत बिकट परिस्थितीत भारताने जगासमोर अनेक आदर्श निर्माण केले आहेत. ही बाब महाविद्यालयीन युवकांनी व विद्यार्थ्यांनी आयुष्यभर आदर्श मानली पाहिजे व यातून सदैव धडा घेत आपली आगेकूच करीत राहिले पाहिजे हाच उद्देश अमोलक – कोरोना विशेषांक काढण्या मागे आहे...

सर्व विद्यार्थ्यांना व कर्मचारी यांना उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा...

**प्राचार्य डॉ. एन.एस. राठी**

# आवश्यक माहिती (संग्रहीत)

ज्या विद्यार्थ्यांना शाळेची पुस्तके पाहीजेत, शाळेची फि भरु शकत नाहीत, त्यांनी खाली दिलेल्या २४ मोबाईल पैकी कुठल्याही नंबरवर संपर्क करा.

| | |
|---|---|
| १) ९४६००३१५५४ | २) ९००१२३६४१४ |
| ३) ९५४९६७७७७० | ४) ९३१४४५९४७४ |
| ५) ९८२८९२६१५१ | ६) ९३२८६२०००३ |
| ७) ९८२६२६७६४९ | ८) ९८८८९८९७४६ |
| ९) ९६५३१५०००४ | १०) ८८८९७१२२३३ |
| ११) ९९२६३११२३४ | १२) ८८८९९९५७३३ |
| १३) ८८८९९९५७३१ | १४) ९८२६८१३७५६ |
| १५) ९७५२०३३२५५ | १६) ९८२६८५८७८५ |
| १७) ७४८९५८७८५१ | १८) ९१७५४७५३८४ |
| १९) ९०९८३२१४२० | २०) ९८७९५३७८०९ |
| २१) ९८२५७०००७० | २२) ९७२७२१५१३० |
| २३) ९८७९२००२४५ | २४) ९३२८२२९२१४ |

या मेसेजला एवढे फॉरवर्ड करा की, तुमच्यामुळे एखाद्या गरीब विद्यार्थ्याचे आयुष्य बदलू शकते.

आवश्य वाचा आणि फॉरवर्ड करा.

खाली दिलेल्या नंबरवर संपर्क करावा.

लाडली फाउंडेशन

९८७१७२७४१५, ९८७३१८२४६८, ९७१७२३१६६३

आपल्या सर्वांना विनंती आहे की, विनोदी चुटकुले पाठवण्यापेक्षा ह्या मेसेजला पाठवा जेणेकरून लोकांना माहिती होईल.

टिप – शेर करा कोणी तरी याचा उपयोग नक्की करेल. माणूस म्हणून जगण्यापेक्षा एक चांगला व्यक्ति म्हणून

**श्री. नाना पाटेकर**

# कोरोना

आज सर्व भारतवासियांनी घराच्या छतावर जाऊन घरातील थाळया मोठ -मोठयाने वाजवुन गो----- कोरोना गो ------- असे ओरडुन पार थाळया चिमटुन तोडुन - मोडुन टाकलया तरी व्हायचे तेच झालं कोरोनाची पहिली लाट ही आलीच. बघता -बघता कोरोनाचा हा: हा: कार संपुर्ण जगात होऊन सर्वच देश टाळेबंद ( लॉकडाऊन ) दिशेने जात सगळे जनजिवन,अर्थव्यवस्था ही कोलमोडुन पडली. माणसालाच माणसाचा द्वेष निर्माण होऊन प्रत्येकजण एकमेकांपासुन दुर राहुन सगळया जगाचा संपर्कच तोडुन टाकावा लागला. कोंडुन घेतलेलया घराच्या बाहेर फक्त स्मशान शांतताच दिसत होती स्वच्छंद वा-याने रस्त्यावरची धुळ मोठयाने गुंई - गुंई आवाज करत आपलयाच तालात जात होती. पशु - पक्षी, प्राण्यां व्यतिरिक्त कोणामध्येही बाहेर जाण्याची हिंमतच होत नव्हती.त्या भयाण शांततेत कुठलयाही क्षणी लांबुन ॲम्ब्युलन्सच्या सायरनचा आवाज मोठ- मोठयाने ऐकु आला की काळजात कस धस्स होत होतं. फक्त सगळेच मनातुन विचार करत होते की, हा संसर्ग आपलया घरातील कोणालाच होऊ नये असे देवापुढे हात जोडुन लोटांगण घेऊन प्रार्थना करत होते. या महाभयंकर कोरोनाच्या लाटेत जीवन जगण्याची केविलवाणी धडपड करतांना ऑक्सिजनचा साठा अपुर्ण पडायला लागला ऑक्सिजन नसलयामुळे किती तरी रुग्णांना आपले प्राण गमवावे लागले. रक्तपेढयाही ओस पडु लागलया कोणीही रक्त देण्यासाठी पुढे येत नव्हतं कित्येकजणांचे रक्तपेढयांमध्ये रक्त उपलब्ध नसलयामुळे प्राण जात होते. गोळया,औषधे पण वेळेवर मिळत नव्हते. रेमडिसिअल इंजेक्शनसाठी तर आमदार, खासदारापासुन मंत्र्यांपर्यंत वजन वापरुन वशिला लावुन वेगवेगळया पध्दतीने वाटेल तेव्हढे पैसा ओतायला तयार होते तरीही ते इंजेक्शन न मिळालयामुळे कित्येकजणांची प्राणाची ज्योत मालविलीच.

कोरोनाच्या काळात जेवढे जीवंत राहण्यासाठी तारेवरची कसरत करणे जसं कठीण होतं त्यापेक्षाही मरण तर त्यापेक्षाही जास्तच कठीण. घरातलं लहान मुल, मोठी माणसं जर अनोवदनाने दगावली तर त्याच्या आणि आपलया शेवटच्या क्षणीसुध्दा त्या प्रेताला हातच काय पण नीटसे डोळे भरुन सुध्दा पाहता येत नव्हते. फक्त लांबुनच त्या पी.पी.ई. किट गुंडाळलेलया प्रेताला पाहुन रडत बसायचं. शेवटी त्याला स्मशानात जाळण्यासाठी घेऊन गेले तरी तिथंही त्याची हेळसांड स्मशानात लांबलचक रांगाच रांगा आज रांगेत प्रेत उभा केले तर दुस-या दिवशी नाहीतर कधी नंबर येईल याची खात्रीच देता येत नव्हती. अशी वेळ कोणावरही येऊ नये. एवढं दुःख होऊनही पाहुणे रावळयांना तर सांत्वण करण्याची तर सोडा पण भेटण्याची सुध्दा मुभा नव्हती नव्हे कुठलाही पाहुणा हा बाहेरगावाहुन येऊच शकत नव्हता आला तरी तो ही परत आपलया गावाकडे सुखरुप जाऊ शकत नव्हता कारण हा रोग आपला विळखा त्याला घालतच होता. जरी तो आपलया गावातुन

कसातरी आलाच तर त्याला त्याच्या गावातील सर्वजण एखादया वाळीत टाकलेलया माणसासारखी वागणुक देत होते. या काळात प्रत्येक खेडेगावातसुध्दा गावक-यांनी गावाकडे येणारे सगळेच रस्ते मोठ- मोठे दगड, धोंडे टाकुन, काटे टाकुन बाहेरगावाहुन हक्काने आपलया गावात येणा-या नातेवाईकांसासाठी वाट आडवुन ठेवली होती. काही वेळा याचाच वाईट परिणाम होऊन गरोदर स्त्रियां,गावातील वयस्क मंडळी, आजारी पडलेली रग्ण हयांना वेळेवर दवाखान्यात घेऊन जाता आले नाही कारण सगळीकडुन गावातील रस्ते हे आडवुन ठेवलेले असायचे कुठेच वाट मोकळी नसायची. दुस-याच गावात अडकुन पडलेले मजुर, काही कामानिमित्त आलेले कित्येक कुटूंबच्या कुटूंब कुठलेही वाहन नसलयामुळे चालत निघण्याशिवाय दुसरा पर्यायच नसलयामुळे त्या कुटूंबाचा अन्न पाण्यावाचुन शेवटी वाईटच अंत झालेला आपलयाला दिसला.शासनाची आलेली पहिली लस घेण्यासाठी जिवंत राहण्यासाठी पहाटेपासुनच लागलेलया रांगा, ती झालेली ससे होलपट आपण कधीही विसरणार नाहीत.

कोरोनाच्या काळातील सर्वात वाईट घटना म्हणजे कित्येक तरूणांचे त्यांना काहीही झाले नसतांना दवाखान्यामध्ये अॅडमिट करून जिवंतपणीच त्यांच्या शरिरातातील महत्त्वाचे अवयव हे काढुन घेण्यात आले. कसली ही जीवंतपणीच मरण यातना सोसावी लागली असेल. हे अवयव काढुन घेणा-यांना असे पाप करणा-यांना देवाची सुध्दा भिती कशी वाटली नसावी.

शेवटी आजची परिस्थिती ही अशी झाली आहे की, ज्या आपण सर्वांनी देवापुढे लोटांगण घालुन येथुन पुढे चांगले वागायचे, काही पाप करायचे नाही, लांडी - लबाडी करायची नाही, प्रत्येक माणसाबरोबर माणुसकीने राहयचं त्याच्या सुख - दुःखाचे वाटेकरी व्हायचं, सकाळ पासुन संध्याकाळ पर्यंत नुसते पळत राहयचं नाही तर कुठे तरी थोडं थांबुन समाजासाठी, कुटूंबासाठी, स्वतःसाठीही थोडा तरी वेळ दयायचा हे सगळे पार आपण सर्वजण विसरुनच गेलेलो आहे. माणुसकी तर फक्त आता नावालाच राहिली आहे पुन्हा एकदा सर्वचजण एकमेकांबाबतीत इर्षा, व्देष, मत्सर तयार करून कुरघोडया करायला सज्ज झालेत. कोरोनाच्या काळात आपला सख्खा भाऊ जरी आपलया दारात आपली मदत किंवा घरातील एखादया कोप-याचा अडोसा राहण्यासाठी मागत असेल तर त्यालाही आपण एखादया भिका-याला जसे खेसकतो तसे खेसकुन लांबुनच नाही तसला अपमान करून हाकलुन दिले असेल. निश्चितच याचा पश्चाताप आपलयाला का होत नसेल. एक लक्षात येत नाही की आपलया सर्वांना या जगात नेमक्या कोणत्या स्थळावर जाऊन पोहचायचे, आपण आपलयाच माणसांबरोबर कायम स्पर्धा का करत बसलोय असे निवांत, शांत, निश्चल दिवसभरातील एखादा क्षण का आपण घालवू शकत नाही. कोरोना या रोगामुळे जी काही माणुसकीची, आत्मियतेची हानी झाली आहे ती हा रोग गेलयामुळे प्रत्येकाने याच्यातुन थोडे काही शिकले तर निश्तिच आपलयामध्ये एक चांगला बदल झालयाशिवाय राहणार नाही.

श्री. महेंद्र पेटकर

# कोरोना व्हायरस (COVID-19)

कोरोना व्हायरस रोग २०१९ (कोविड-१९) हा एक अति संसर्गजन्य रोग आहे. जो गंभीर तीव्र श्वसन सिंड्रोम-संबंधित कोरोनाव्हायरस २ अथवा (एसएआरएस-कोव्ह-२) (SARS-CoV-2) या नावाच्या नवीन विषाणूद्वारे होतो. ज्या सार्स (SARS-CoV) १) या रोगाने आग्नेय आशियामध्ये थैमान घातले होते. त्या कोरोना व्हायरस विषाणूच्या प्रजातीतील पण पूर्णपणे नवीन असा हा विषाणू आहे.

डिसेंबर २०१९ मध्ये चीनच्या हुबेई प्रांताची राजधानी वुहानमध्ये या नवीन आजाराची पहिली ओळख करण्यात आली होती. (तेथेच हा रोग कृत्रिमपणे तयार करण्यात आला) आणि त्यानंतर जागतिक स्तरावर या आजाराचा प्रसार झाला व त्याने जागतिक महामारीचे रुप घेतले. या आजाराच्या सामान्य लक्षणांमध्ये ताप, खोकला आणि श्वास लागणे यांचा समावेश आहे. तर इतर लक्षणांमध्ये थकवा, स्नायू दुखणे, अतिसार, घसा खवखवणे, गंध कमी होणे आणि पोटदुखी या लक्षणांचा समावेश असू शकतो. सामान्यतः लागण झाल्यापासून लक्षणे दिसण्यापर्यंतचा कालावधी हा दोन ते चौदा दिवसांचा असू शकतो. बहुतेक प्रकरणांमध्ये सौम्य लक्षणे अढळतात. तर काही रोग्यांमध्ये व्हायरस न्युमोनिया आणि बहु-अवयव निकामी होण्याची भीती असते. १२ एप्रिल २०२१ पर्यंत जगातील १८५ देशातील १३,५८,६९,७०४ पेक्षा जास्त लोकांना हा रोग झाला असल्याची प्रकरणे नोंदवणी गेली आहेत.परिणामी २९,३५,२७१ पेक्षा जास्त लोक मरण पावले आहेत. ७,७२,८४,५६६ पेक्षा जास्त लोक बरेही झाले आहेत. एकूण संसर्ग झालेल्या रोग्यांपैकी २% लोकांचा मृत्यु झला आहे.

महाराष्ट्रातील कोरोना विषाणू उद्रेकातील पहिल्या रुग्णाची नोंद ९ मार्च २०२० रोजी पुण्या झाली. हा विषाणू प्रामुख्याने जवळच्या संपर्कादरम्यान खोकल्यामुळे, शिंकण्यामुळे किंवा बोलताना नकळत बाहेर पडणाऱ्या थुंकीच्या तुषारांमुळे पसरतो. हे थेंब अथवा तुषार श्वासोच्छवासाच्या दरम्यानदेखील बाहेर पडून आजूबाजूच्या जमिनीवर किंवा पृष्ठभागांवर पडतात व अशा दूषित पृष्ठभागाला हाताने स्पर्श करुन आणि नंतर तोच त्यांच्या चेहऱ्याला लावल्यानेही लोक संक्रमित होऊ शकतात. हे विषाणू ७२ तासांपर्यंत या दूषित पृष्ठभागांवर जिवंत राहू शकतात. लक्षणे दिसल्यानंतरच्या पहिल्या तीन दिवसांत हा विषाणू सर्वात जास्त संक्रामक असतो, परंतु रोगाची लक्षणे दिसण्यापूर्वी देखिल आणि रोगाच्या नंतरच्य टप्प्यात देखील फार संक्रामक असतो. या रोगाच्या निदानाची मानक पध्द म्हणजे नाकातून घेतलेल्या नमुन्यांची रीअल-टाइम रिव्हर्स ट्रान्सक्रिप्शन पॉलिमरेज चेन रिएक्शन (आरआरटी-पीसीआर) (rRT-PCR) यावाची तपासणी होय.

वारंवार साबणाने व्यवस्थित हात धुणे, इतरांशी शारीरिक अंतर राखणे (विशेषतः लक्षणे असणाऱ्या लोकांकडून) खोकताना किंवा शिंकताना रुमालाचा वापर करणे. अचानक शिंक आली असताना व रुमाल जवळ नसल्यास कोपर तोंडावर धरुन हाताच्या आतल्या ाजुला शिंकणे. न घुतलेले हात चेहऱ्यापासुन दूर ठेवणे या व अशा उपायांचा वापर केल्यास विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यात मदत होते.

ज्यांना विषाणूची लागण झाल्याचा संशय आहे अथवा सौम्य लक्षणे दिसत आहेत अशांना आणि त्यांची काळजी घेणाऱ्या अथवा त्यांच्या संपर्कात येणाऱ्या सर्वांनी मास्क वापरण्याची शिफारस केली जाते. सध्या, कोरोना व्हायरस रोग २०१९ (कोविड-

१९) वर जगात कोणतीही लस किंवा विशिष्ट उपचार नाहीत. फक्त रोग्याच्या लक्षणांवर आधारीत उपचार, प्रतिकार शक्ती वाढविण्याचे उपाय, विलगीकरण व काही प्रयोगात्मक उपाय या गोष्टींचा उपचार म्हणून वापर केला जातो.

जागतिक आरोग्य संघटनेने हा कोरोनाव्हायरस रोग २०१९ (कोविड–१९) चा उद्रेक हा सार्वजनिक आरोग्यासाठी आंतरराष्ट्रीय आणीबाणी असल्याचे सांगत या उद्रेकाला जागतिक महामारी जाहीर केली.

टेड्रॉस ॲडमहॅनीम गेब्रेयेसोस यांनी Covid-19 नाव घोषित केले. इंटरनॅशनल कमिटी ऑफ टॅक्सोनॉमी ऑफ व्हायरस यांनी SARS-CoV-2 हे नाव दिले.

* लक्षणे : कोरोनाव्हायरस रोग २०१९ (कोविड–१९) विषाणूचा संसर्ग झालेल्यांना ताप, खोकला, थकवा आणि श्वास लागणे अशी फ्लूसारखी लक्षणे दिसू शकतात. श्वास घेण्यात अडचण, सतत छातीत दुखणे किंवा छातीवर दबाव असल्यासारखे वाटणे, गोंधळून जाणे, चेहरा किंवा ओठ निळे होणे यासारखी लक्षणे आढळल्यास तात्काळ वैद्यकिय उपचारांचा सल्ला दिला जातो. शिंका येणे, नाक वाहणे किंवा घसा खवखवणे अथवा मळमळ, उलट्या किंवा अतिसार ही लक्षणे फार कमी रुग्णांमध्ये दिसून आली आहेत.

* प्रसाद : हा रोग कसा पसरतो याबद्दलचे काही तपशील निश्चित केले गेले आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने आणि अमेरीकेच्या सेंटर ऑफ डिसीज कंट्रोल ॲण्ड प्रिव्हेंशन (सीडीसी) या संथांच्या म्हणण्यानुार हे विषाणु मुख्यत= दोन व्यक्तींच्या जवळच्या संपर्काच्या वेळी तसेच खोकला, शिंका येणे किंवा बोलताना बाहेर पडणाऱ्या थेंबाद्वारे परसतात. जवळचा संपर्क म्हणजे १ मीटर अथवा ३ फुट समजले जाते. सिंगापूरमधील एका संशोधनात असे आढळले आहे की, खोकताना किंवा शिंकताना रुमालाचा वापर न केल्यास किंवा मास्कचा वापर न केल्यास कोरोनाव्हायरस रोग २०१९ (कोविड–१९) विषाणू हवेतून १५ फुटापर्यंत लांब पसरु शकतात. हे विषाणू जवळच्या लोकांच्या तोंडात किंवा नाकात शिरतात आणि श्वासोच्छवासाद्वारे फुफ्फुसांमध्ये पोहचतात. प्रारंभिक अभ्यासानुसार कोरोनाव्हायरस रोग २०१९ (कोविड–१९) विषाणूच्या संक्रमित व्यक्तींची संख्या ही दर ६ ते ७ दिवसांची दुप्पट होते आणि याचे मूलभूत पुनरुत्पादन प्रमाण (RO) हे २.२–२.७ असल्याचे मानले जात होते. परंतु ७ एप्रिल २०२० रोजी प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार वुहानमधील साथीच्या सुरुवातीच्या काळात संक्रममित व्यक्तींची संख्या ही दर २.२ ते ३.३ दिवसांनी दुप्पट झाली होती.

जेव्हा एखाखी व्यक्ती एखाद्या दूषित पृष्ठभागाला स्पर्श केल्यानंतर त्याच हाताने डोळ्यावर, नाकात किंवा तोंडाला स्पर्श करते तेव्हा अशा कृतीने ती व्यक्ती संक्रममित होते त्यास फोमेट ट्रान्समिशन म्हणून ओळखले जाते. संक्रमित व्यक्तीच्या मलमुत्रातून विषाणूचे संक्रमण पसरते अशी चिंता व्यक्ती केल जात असली तरी हा धोका कमी असल्याचे ही मानले जाते.

लक्षणे दिसू लागताना हा विषाणू सर्वात जास्त संक्रामक असतो परंतु लक्षणे दिसत नसतानाही व ती उद्भवण्याआधी ही एखाद्या व्यक्तीद्वारा विषाणू पसरवला जाण्याची शक्तय आहे. परंतु अशी जोखीम कमी असल्याचे मानले जाते. युरोपीयन सेंटर फॉर डिसीज प्रिव्हेंशन एंट कंट्रोल (ईसीडीसी) या संस्थेच्या म्हणण्यानुसार हा रोग किती सहजतेने पसरतो हे पूर्णपणे स्पष्ट नसले तरी एक व्यक्ती साधारणपणे दोन ते तीन इतर व्यक्तींना संक्रममित करते.

❋ निदान : १७ जानेवारी २०२० रोजी जागतिक आरोग्य संघटनाने सार्स–सीओव्ही–२ साठी अनेक आरएनए चाचणीचे मानदंड प्रकाशित केले व रिअल–टाइम ट्रान्सक्रिप्शन पॉलिमरेज चेन रिएक्शन (rRT-PCR) ही चाचणी कोरोना लागण झाल्याचे पुष्टीकरण करण्यासाठी प्रमाणित केली ही चाचणी विशेषतः नाकातुन घेतलेल्या नमुन्यांची अथवा घशातुन घेतलेल्या थुंकीच्या नमुन्यांवर केली जाते. चिनच्या शास्त्रज्ञांना कोरोनाव्हायरसच्या नमुन्याच्या विश्लेषणाअंती ह्या विषाणुचे जनुकीय गुणसुत्र मिळवण्यात यश मिळाले. जगभरातील संशोधकांना स्वतःचे रिअल–टाइम रिव्हर्स ट्रान्सक्रिप्शन पॉलिमरेज चेन रिएक्शन (rRT-PCR) ह्या चाचणीसाठीचे टेस्ट किट बनवण्यासाठी मदत होईल या उद्देशाने ते संशोधन चिनच्या शास्त्रज्ञांनी जाहीर प्रकाशित केले. ७ एप्रिल २०२० रोजी भारतात कोरोनाचा वाढता पादुर्भाव पाहता राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेने एचएलएल लाइफकेअर लिमिटेड या सरकारी कंपनीने विकसित केलेले रॅपिड अँटिबॉडी ब्लड टेस्ट किटला प्राथमिक चाचणी म्हणन मान्यता दिली. १५ ते २० मिनिटांत होणाऱ्या या चाचणीच्या मदतीने कोरोना प्रादुर्भाव कोणत्या भागात वाढत आहे. याचा आभ्यास करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. या रॅपिड अँटिबॉडी ब्लड टेस्ट अँटिबॉडी ब्लड टेस्टची अचूकता केवळ ६० ते ७०% आहे असा चिन मधील अनुभव आहे. अँटिबॉडी रक्त चाचणीत रुग्ण संक्रमित असल्याचे आढळल्यास त्या रुग्णांची जागतिक आरोग्य संघटनाने प्रमाणित केलेली ïठ्ढ–झउठै चाचणी होणार आहे.

❋ प्रतिबंध : रोगाचा प्रसार रोखण्यासाठीचे धोरण म्हणून वारंवार साबणाने व्यवस्थित (कमीतकमी २० सेकंद) हात धुणे, इतरांशी शारीरिक अंतर राखणे (विशेषतः लक्षणे असणाऱ्या लोकांकडून) खोकताना किंवा शिंकताना रुमालाचा वापर करणे. अचानक शिंक आली असताना व रुमाल जवळ नसल्यास कोपऱ्याने हाताची घडी घालून खाकेच्या दिशेने आतील बाजूस शिंकणे. न धुतलेले हात चेहऱ्यापासून दूर ठेवणे या उपायांचा वापर केल्यास विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यात मदत होते. सामाजिक शारीरिक अंतर हा कोरोना व्हायरस सारख्या अति संक्रामक रोगाचा प्रसार रोखण्याच्या उपायांपैकी सर्वात महत्वाचा विषय आहे. निदान न झालेल्या पण संक्रमित असलेल्या अशा व्यक्तींच्या मार्फत समाजात होणारे संभाव्य संक्रमण रोखण्यासाठी या उपायाचा फार फायदा होतो. शाळा आणि कामाची ठिकाणे बंद करुन, प्रवासावर प्रतिबंध घालून आणि सार्वजनिक मेळावे रद्द करुन संभाव्य संक्रमित व्यक्तींचा इतरांशी संपर्क कमी करण्यामागचा उद्देश असतो. दोन व्यक्तींमधील अंतराच्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे कमीतकमी ६ फूट (१.८ मीटर) अंतर राखणे आवश्यक आहे. बऱ्याच देशांनी शिफारस केली आहे की निरोगी व्यक्तींनी देखील जनतेत जाताना मास्क किंवा स्कार्फचा वापर करावा.

हा विषाणू एखाद्या पृष्ठभागावर काही तासांपासून काही दिवसांपर्यंत जिवंत राहू शकतो. विशेषतः कागदी पुठ्यावर एका दिवसासाठी प्लास्टिक (पॉलीपॉपिलिन) तसेच स्टेनलेस स्टिल (एआरएसआय ३०४) वर तीन दिवस आणि शुध्द तांब्याच्या वस्तुंवर चार तासांपर्यंत राहु शकतो परंतु हा काळ आर्द्रता आणि तापमानानुसार बदलतो.

**प्रा.डॉ. एस.एस. पाताळे**

# श्री अमोलक देवराई
# पवित्र वनस्पतींची लागवड

**प्रा. पाताळे एस.एस.**
वनस्पतीशास्त्र विभाग,
गांधी महाविद्यालय, कडा

श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ संचलित श्रीमती शांताबाई कांतीलाल गांधी कला, अमोलक विज्ञान व पनालाल हिरालाल गांधी वाणिज्य महाविद्यालय कडा, ता. आष्टी, जि. बीड येथील महाविद्यालयाच्या जागेत श्री अमोलक देवराई या नावाने पवित्र व औषधी वनस्पतींची लागवड दि. १६/०७/२०२१ रोजी करण्यात आली. यामध्ये जैन धर्मातील पवित्र अंक १००८ झाडे लावली आहेत. यात २४ जैन तिर्थंकर त्यांची वृक्षे, पाच प्रकारचे तुळस, बेल, रुद्राक्ष, सर्पगंधा, अश्वगंधा, नागकेशर, मेडसिंधी, नारळ, चित्रक, मेहंदी, मोह, मधुमालती, कांचन, चंदन, खजूर, सुपारी, मोरवेल, मधुनाशिनी, सिताअशोक, तोरण, पळस, शंकासूर, नांद्रुक, चारोळी, उंबर, रिठा इ. झाडांची १७१ प्रकारची झाडे लागवड केलेली आहेत.

आमची संस्था जैन अल्पसंख्यांक असल्याने २४ जैन तिर्थंकर व त्यांची केवलज्ञान वृक्ष अमोलक देवराईत लावली आहेत.

जैन तिर्थंकर आणि त्यांचे केवलज्ञान वृक्ष

| | | |
|---|---|---|
| १. आदिनाथ – वड | ९. सुविधीनाथ – नागकेशर | १७. कुंथूनाथ – बच |
| २. अजितनाथ – साल | १०. शीतलनाथ – बेल | १८. अरानाथ – आंबा |
| ३. सांबवनाथ – साल | ११. श्रेयसन्मथ – पळस | १९. मल्लिनाथ – अशोक |
| ४. अभिनंदननाथ – प्रियंगू | १२. वसुपूज्य – कदंब | २०. मुलसुवृत – सोनचाफा |
| ५. सुमतीनाथ – साल | १३. विमलनाथ जांभूळ | २१. नमिनाथ – बकुळ |
| ६. पद्प्रभा – प्रियंगू | १४. अनंतनाथ – पिंपळ | २२. नेमिनाथ – वेतस |
| ७. सुपार्श्वनाथ – बाभूळ | १५. धर्मनाथ सप्तपर्णी | २३. पार्श्वनाथ – धायती |
| ८. चंद्रप्रभा – नागचंपा | १६. शांतीनाथ – नंदिवृक्ष | २४. महाविर – साल |

अशा या तिर्थंकर व त्यांचे केवलज्ञान वृद्वासोबत औषधी वनस्पती, वनस्पतीशास्त्र विषयासाठी लागणारी विविध झाडे लावली आहेत.

अमोलक देवराईत विविध झाडासोबत सुंदर अशी कुटी व सभोवताली औषधी वनस्पती छानशा वेली व छोटेसे तलाव असून यात कमळ लागवड करण्यात आली आहे.

श्री अमोलक देवराईसाठी संस्थेचे मोठे योगदान आहे. संस्थेचे सर्व पदाधिकारी वेळोवेळी देवराई तयार

करण्यासाठी जमिन उपलब्ध करुन दिली व पाईपलाईन करुन ठिबकद्वारे पाण्याची सोय केलेली आहे. संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. कांतीलालजी चाणोदिया साहेब, विश्वस्त अध्यक्ष मा.श्री. गोकुळदासजी मेहेर साहेब, मा.श्री. योगेशकुमारजी भंडारी साहेब, मा.श्री. हेमंतकुमारजी पोखर्णा साहेब, मा.श्री. उमेशकुमारजी गांधी, मा.श्री. अनिलकुमारजी झाडमुथ्था, मा.श्री. बाबुशेठ भंडारी साहेब, मा.श्री. महेंद्रकुमारजी पटवा साहेब, मा.श्री. पोपटलालजी भंडारी साहेब, मा.श्री. बिपीनकुमार भंडारी साहेब सर्वांचे वेळोवेळी सहकार्य लाभत आहे.

श्री अमोलक देवराईसाठी वृक्षांची रोपे मा.श्री. अविनाशजी दळवी साहेब (आर.टी.ओ., पुणे) यांनी स्वखर्चाने आणून दिले. तसेच मा.श्री. दिलीपशेठ पटवा यांनी १० बॅग कंपोष्ट खत दिले. तसेच वृक्षाची लागवड नियोजनपूर्वक व्हावे म्हणून बऱ्याच मान्यवरांचे सहकार्य लाभले यामध्ये श्री. रघुनाथ ढोले सर, श्री. राहुल घोलप सर, श्री. लाला साहेब माने, श्री. राहुल दहितुले, श्री. सुधाकर चव्हाण, श्री. मिलिंदगिरधारी, श्री. सिध्दार्थ सोनवणे, श्री. आप्पासाहेब पोकळे, श्री. काका काकडे यांचे सहकार्य लाभले. देवराईतील वृक्ष लागवडीकरीता जमिनीची निवड करण्यापासून ते पाण्याचे नियोजन करण्यासाठी वेळोवेळी सहकार्य करणारे महाविद्यालयाचे मा. प्राचार्य नंदकुमार राठीसर, उपप्राचार्य डॉ. जवाहरलाल भंडारी सर, महाविद्यालयातील सर्व स्टाफ, संस्थेचे सर्व पदाधिकारी, संस्थेचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभत आहे. तसेच देवराईतील झाडे सर्वांच्या सहकार्याने वाढत आहेत.



# Department of English
# Annual Report 2021-22

